POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२३३ ● मुंबई, शुक्रवार, २७ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## मुंबईचे डबेवाले मोठ्या संकटात... इराण युद्धामुळे एलपीजी टंचाई
## डब्यांच्या संख्येत मोठी घट... डबेवाले आणि ग्राहकही 'गॅस'वर

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

इस्रायल, अमेरिका - इराण युद्ध सुरू झाल्यानंतर देशात एलपीजी गॅसचा तुटवडा भासत आहे. त्याचबरोबर व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला आहे. अशा परिस्थितीत अनेक शहरांमधील हॉटेल व्यवसाय बंद ठेवण्याची नामुष्की ओढवली आहे. इतकेच नव्हे तर हॉटेलांसह अनेक ठिकाणी खानावळी आणि जेवणाचे डबे पुरविणाऱ्या संस्थांचे, महिला गटांचे तसेच खासगी किचनही बंद देवण्यात आले आहे. या सगळ्याचा फटका मुंबईतील डबेवाल्यांना बसला असून ते मोठ्या संकटात सापडले असून डब्यांच्या संख्येत मोठी घट झाल्याने ही सेवा विस्कळीत झाली आहे.

**डबेवाल्यांची संख्याही रोडावली**

एलपीजी गॅसच्या तुटवड्यामुळे जे ग्राहक पूर्णपणे खानावळ किंवा कम्युनिटी किचनवर अवलंबून होते, त्यांची डब्याची सेवा खंडीत झाली आहे. यामुळे अनेकजणांनी डबा बंद केला आहे.मुंबईतील दादर, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, वांद्रे,



चर्चगेट आ प्रमुख रेल्वे स्थानकांच्या परिसरात रोज सकाळी पांढऱ्या कपड्यात, डोक्यावर गांधी टोपी चढवलेले अनेक डबेवाले दिसत असत.तसेच सायकलवर मोठ्या कौशल्याने डबे अडकवून तेथून पुढे ते कार्यालयात पोहोचवण्याची डबेवाल्यांची धडपड दिसत असे. मात्र आता डबेवाल्यांची संख्या रोडावलेली दिसत आहे.

**गॅस टंचाईमुळे खानावळीही संकटात**

विशेष म्हणजे टिफीन सेवा देणाऱ्या अनेक खानावळीही गॅस टंचाईमुळे संकटात आल्या आहेत. यापूर्वी एका खानावळीतून रोज १०० ते १२५ लोकांचे जेवण बनविले जात असे, मात्र आता केवळ ४० माणसांचे जेवण बनविले जात आहे.जेव्हापासून खानावळी बंद झाल्या आहेत, तेव्हापासून गआहकांना जेवणाची व्यवस्था अन्यत्र करावी लागत आहे. त्यामुळे डबेवाल्यांबरोबरच त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या चाकरमानी ग्राहकांचा खर्चही वाढला आहे.

**डब्यांच्या संख्येत कमालीची घट**

गॅस सिलिंडरच्या कमतरतेमुळे ग्राहकांच्या संख्येत कमालीची घसरण झाली आहे. पूर्वी हजारो डबे रोज हाताळले जात होते. आता त्यांची संख्या कमी झाली आहे. त्याचा डबेवाल्यांच्या उत्पन्नावर थेट, तत्काळ परिणाम होत आहे. गेल्या कित्येक वर्षांपासून अविरत सुरू असलेली डबेवाल्यांची सेवा गॅसच्या तुटवड्यामुळे पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर विस्कळित झाली आहे. अनेक खानावळी बंद झाल्यामुळे डब्यांच्या संख्येत कमालीची घट झाल्याने सेवेवर परिणाम झाला आहे, अशी चिंता काही डबेवाल्यांनी व्यक्त केली.

### आता गॅसची चिंता मिटली, राज्य सरकारची मोठी घोषणा
## सर्वसामान्यांना सर्वात मोठा दिलासा

मध्य पूर्वेत युद्धामुळे मोठा तणाव निर्माण झाला आहे. या तणावामुळे जगभरात मोठं ऊर्जा संकट निर्माण झालं आहे. या संकटातून भारत देखील सुटला नाहीये. भारतामध्ये सध्या मोठ्या प्रमाणात गॅस आणि इंधनाची टंचाई जाणवत आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा होत नसल्यानं अनेक हॉटेल व्यावसायिकांना आपलं हॉटेल बंद ठेवण्याची वेळ आली आहे. यामुळे त्यांचं मोठं नुकसान होत आहे. दरम्यान युद्धाची परिस्थिती आणखी काही दिवस अशीच राहिली तर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते, ते टाळण्यासाठी आता सरकारने पावलं उचलण्यास सुरुवात केली आहे. सरकारने मोठा निर्णय घेतला आहे, यामुळे सर्व सामान्य लोकांना मोठा दिलासा मिळणार आहे. राज्यातील इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारकडून 37 लाख 44 हजार लिटर केरोसीनच्या वाटपासाठी राज्याला मंजुरी देण्यात आली आहे. आता या मंजुरीनंतर प्रति कुटुंब किंवा शिधापत्रिका असलेल्यांना 3 लिटर केरोसीन देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. एलपीजी तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून तात्पुरत्या स्वरुपात आता केरोसीन वाटप केलं जाणार आहे. राज्य सरकारकडून जिल्हानिहाय आवश्यक केरोसीन वितरण देखील निश्चित करण्यात आलं आहे. मार्च-एप्रिल 2026 मध्ये राज्यात तिनही सरकारी तेल कंपन्यांकडून केरोसीनचं वाटप केलं जाणार आहे. एकूण वाटपाच्या 85 टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात वितरीत करण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही, असे कुटुंब देखील केरोसीनच्या उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील, असं देखील सरकारने म्हटलं आहे. प्रतिसादाच्या अनुषंगाने श्वेतपत्रिकाधारक देखील केरोसीन मिळण्यास पात्र असणार आहेत.

**गॅसच्या तुटवड्यामुळे हाल**

दरम्यान सध्या देशासह राज्यात मोठ्या प्रमाणात गॅस टंचाई जाणवत आहे. गॅसचा पुरवठा होत नसल्यानं अनेकांना चुलीवर स्वयंपाक करण्याची वेळ आली आहे. तर व्यावसायिक गॅसच्या पुरवठ्याअभावी अनेक हॉटेल चालकांनी आपली हॉटेल बंद ठेवली आहेत, त्यांचं मोठं नुकसान होत आहे. गॅसचा तुटवडा दूर करण्यासाठी आता केंद्र आणि राज्य सरकारकडून आवश्यक ती पाउलं उचलली जात असल्याचं पाहायला मिळत आहे.

## शेतकऱ्यांसाठी महत्वाची बातमी! राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता, शेतकऱ्यांनी काय काळजी घ्यावी

■मुंबई। प्रतिनिधी,

सध्या राज्यातील वातावरणात मोठा बदल झालेला दिसून येत आहे. अनेक भागात वादळी वाऱ्यासह पाऊस होताना दिसत आहे. काही भागात गारपीट झाल्यामुळं शेती पिकांना मोठा फटका बसत आहे. दरम्यान, हवामानाच्या संदर्भात राज्याच्या कृषी विभागानं महत्वाची माहिती दिली आहे. 30 ते 31 मार्च दरम्यान राज्यात मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी योग्य ती खबरदारी घ्यावी,



**30 मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती**

सध्या राज्यातील काही भागात अंशतः आभाळी हवामान असून ही स्थिती या आठवड्यात कायम राहण्याची शक्यता आहे. राज्याच्या दक्षिण भागांमध्ये दुपारनंतर स्थानिक स्वरूपाचा वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस प्रामुख्याने कर्नाटक व तेलंगणा सीमेलगत असलेल्या मराठवाडा, मध्य महाराष्ट्र व विदर्भातील सीमावर्ती भागांमध्ये राहण्याची शक्यता आहे. 30 मार्च दरम्यान राज्यातील काही भागांमध्ये प्रामुख्याने दुपारनंतर आभाळी हवामान तयार होऊन मेघगर्जनेसह पाऊस आणि वादळी वाऱ्यांची स्थिती निर्माण होण्याचा प्राथमिक अंदाज आहे. सध्याच्या अंदाजानुसार ही स्थिती प्रामुख्याने खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ तसेच मध्य महाराष्ट्रातील भागांमध्ये दिसून येऊ शकते. उर्वरित विदर्भात देखील हवामानात बदल दिसू शकतो. या दरम्यान विजांचा कडकडाट, वादळी वारे, पाऊस आणि काही ठिकाणी गारपिटीची शक्यता नाकारता येत नाही. 31 मार्च रोजीदेखील राज्याच्या काही भागांमध्ये या हवामानाचा परिणाम दिसू शकतो.

असं आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आलं आहे. शेतकऱ्यांनी काढणी केलेल्या पिकांना वादळी पाऊस आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे असे कृषी विभागाकडून सांगण्यात आलं आहे. तसेच पुढील 3 तासात रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसासह मध्यम स्वरूपाच्या मेघगर्जनेसह वादळी पावसाची दाट शक्यता आहे.

**शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे**

शेतकऱ्यांनी पुढील काही दिवस हवामानाच्या अद्ययावत अंदाजांकडे लक्ष ठेवावे व त्यानुसार शेतीची कामे नियोजित करावीत. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरु असल्याने शेतकऱ्यांनी काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावीत किंवा झाकून ठेवण्याची व्यवस्था करावी. तसेच वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीटीपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात येत आहे.

## धार्मिक भावना! दर गुरुवारी मांस विक्री बंद, 5 हजारांच्या दंडाची तरतूद
### महाराष्ट्रातील कोणत्या नगरपरिषदेने घेतला निर्णय?

**नियमांचे उल्लंघन केल्यास तब्बल पाच हजार रुपयांचा दंड**

नगरपरिषदेकडून स्पष्ट सूचना देण्यात आल्या आहेत की, गुरुवारी मांस विक्री करताना आढळल्यास संबंधित दुकानदारांवर कडक कारवाई करण्यात येईल. नियमांचे उल्लंघन केल्यास तब्बल पाच हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्येही या निर्णयाबाबत गांभीर्य दिसून येत आहे. या निर्णयाला शहरातील भाविक आणि नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळताना दिसत आहे. अनेकांनी हा निर्णय योग्य असल्याचे सांगत प्रशासनाचे समर्थन केले आहे. काही मांस विक्रेत्यांनी देखील सामाजिक आणि धार्मिक भावना लक्षात घेऊन स्वेच्छेने दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.




■सोलापूर। प्रतिनिधी,

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट या धार्मिक नगरीत दर गुरुवारी चिकन-मटण विक्री पूर्णपणे बंद ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. अक्कलकोट नगरपरिषद प्रशासनाने हा निर्णय अंमलात आणताच शहरात त्याची काटेकोर अंमलबजावणी सुरू झाली आहे. गुरुवारी बहुतांश मांस विक्रीची दुकाने बंद असल्याचे चित्र दिसून आले.

**अक्कलकोट नगरपरिषदेने कशामुळे घेतला निर्णय?**

अक्कलकोट हे श्री स्वामी समर्थ यांच्या पवित्र स्थळामुळे ओळखले जाते. देशभरातून हजारो भाविक येथे दर्शनासाठी येत असतात. या धार्मिक वातावरणाला साजेसे वातावरण कायम राहावे आणि भाविकांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, या उद्देशानेच नगरपरिषदेकडून हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, अक्कलकोटमधील या निर्णयामुळे इतर धार्मिक शहरांमध्येही अशा प्रकारचे नियम लागू करण्याबाबत चर्चा सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. धार्मिक श्रद्धा आणि स्थानिक प्रशासन यांचा समतोल साधत घेतलेला हा निर्णय भविष्यात आदर्श ठरू शकतो, अशी प्रतिक्रिया काही नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## सप्तश्रृंगी गडाकडे पायी चालणाऱ्या भाविकांवर काळाचा घाला
### कारने चिरडल्याने महिला ठार, दोन भाविक जखमी



■धुळे। प्रतिनिधी,

सप्तश्रृंगी गडाकडे पायी चालणाऱ्या भाविकांवर काळाने घाला घातल्याची दुर्दैवी आणि हृदद्रावक घटना घढली. जिल्ह्यातील शिरपूरकडून सप्तश्रृंगी गडाकडे पायी जाणाऱ्या भाविकांना चार चाकी वाहनाने चिरडल्याने या अपघातात एका 35 वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर दोन भाविक गंभीरित्या जखमी झाले आहेत. अपघातानंतर पायी यात्रेतील इतर बांधवांनी संताप व्यक्त करत तात्काळ जखमींना उपचारासाठी रुग्णालयात नेले. मात्र, उपचारापूर्वीच एका महिलेचा मृत्यू झाल्याची दुखद घटना घडली. अपघातातील जखमींना शासकीय रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून आमदार काशीराम पावरा यांनी तात्काळ रुग्णालयात पोहोचून जखमींची विचारपूस केली. शिरपूर तालुक्यातील दहिवद फाटा येथील मुंबई-आग्रा महामार्गावरील आज रोजी ही दुर्घटना घडली. मध्य प्रदेशकडून मुंबईकडे जाणाऱ्या वाहनाने भाविकांना चिरडल्याची दुर्दैवी घटना घडली.

## कोकणात पडला गारांचा पाऊस...
### ऐन कडाक्याच्या उन्हात राज्यात कोसळणार... कधी? कुठे? जाणून घ्या!

■मुंबई। प्रतिनिधी,

सध्या महाराष्ट्राच्या काही भागांत आंशिक ढगाळ वातावरण आहे. ही स्थिती पुढील एक आठवडाभर कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

राज्याच्या दक्षिण भागात दुपारनंतर स्थानिक स्वरूपात वादळी पाऊस पडू शकतो. हा पाऊस मुख्यतः कर्नाटक आणि तेलंगणा सीमेवरील भागांत जास्त दिसण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कोकणात अचानक गारांचा पाऊस पडला. तसेच राज्यात 2 दिवस मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. याबद्दल सविस्तर जाणून घेऊया.

राज्यातील विविध भागात 30 आणि 31 मार्चला मेघगर्जनेसह पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. दरम्यान लांजा, रत्नागिरीसह काही



**शेतकऱ्यांसाठी कृषी विभागाचे महत्वाचे आवाहन**

हवामानाच्या अद्ययावत अंदाजाकडे लक्ष ठेवा. सध्या रब्बी पिकांची काढणी सुरु आहे. त्यामुळे काढणी झालेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवा किंवा चांगल्या प्रकारे झाकून ठेवा, असे आवाहन कृषी विभागाने शेतकऱ्यांना स्पष्ट आवाहन केले आहे की, वादळी वारे, पाऊस आणि गारपीट यांपासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी योग्य खबरदारी घ्या. शेतीची कामे हवामानानुसार आखा, असे आवाहन करण्यात आले आहे.

भागात आज गारांचा पाऊस पडला आहे. यामुळे आंबा, काजू बागायतदारांचे मोठे नुकसान झाले आहे. आंब्याला नुकताच आलेला मोहर यामुळे गळून पडलाय. आता काय नुकसान भरपाई मिळणार? याची आंबा बागायतदार वाट पाहत आहेत.

**30 मार्चला कोणत्या भागांत वादळी पाऊस आणि गारपीट?**

30 मार्च रोजी खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रात मेघगर्जनेसह पाऊस, वादळी वारे आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. दुपारनंतर आभाळ दाट होऊन विजांचा कडकडाट, जोरदार वारे आणि पाऊस पडेल. उर्वरित विदर्भातही हवामानात बदल होऊ शकतो. या दिवशी शेतकऱ्यांना विशेष सावधानी बाळगावी लागणार आहे कारण पिकांना नुकसान होण्याची भीती आहे.

**31 मार्चलाही हवामानाचा प्रभाव कायम**

31 मार्च रोजी देखील राज्याच्या काही भागांत हीच वादळी हवामानाची स्थिती कायम राहण्याची शक्यता आहे. मेघगर्जना, वादळी वारे, पाऊस आणि गारपीट यांचा परिणाम काही जिल्ह्यांत दिसू शकतो. हवामान विभागाने दिलेल्या प्राथमिक अंदाजानुसार, ही स्थिती मुख्यतः दुपारनंतर निर्माण होईल. शेतकऱ्यांनी हवामान अपडेट नियमित तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## शाळेच्या ट्रस्टीच्या मुलाची शिक्षिकेला अश्लील व्हिडीओ पाठवत शरीरसुखाची मागणी

**मनसेचे आंदोलन करताच आरोपी अटकेत**

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, शाळेचे ट्रस्टी शिवा अय्यर यांचा मुलगा सरवना अय्यर हा गेल्या काही दिवसांपासून पीडित शिक्षिकेला वारंवार मोबाईलवर अश्लील मेसेज पाठवून त्रास देत होता. इतकेच नाही तर त्याने शिक्षिकेला अश्लील व्हिडिओ पाठवून तिच्याकडे अयोग्य शरीरसंबंधांची मागणी केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या सततच्या त्रासामुळे मानसिक दबावाखाली असलेल्या शिक्षिकेने अखेर आपल्या आईसह महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांकडे धाव घेऊन न्यायाची मागणी केली. मनसेचे नेते राहुल कामत, अरुण जांभळे आणि महिला पदाधिकारी कोमल पाटील यांनी कार्यकर्त्यांसह शाळेवर धडक दिली आणि आरोपीला तातडीने पोलिसांच्या स्वाधीन करण्याची मागणी केली. यावेळी शाळेत सुमारे तासभर मोठा गदारोळ आणि तणावाचे वातावरण निर्माण झाले होते, आंदोलकांनी घोषणाबाजी करत प्रशासनाचा निषेध केला.

■डोंबिवली। प्रतिनिधी,

डोंबिवलीतील सागाव परिसरात असलेल्या एका नामांकित शाळेत शिक्षणाच्या पवित्र क्षेत्राला काळीमा फासणारी एक अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. जय भारत हायस्कूलमधील एका शिक्षिकेला शाळेच्याच ट्रस्टीच्या मुलाने अश्लील व्हिडिओ आणि मेसेज पाठवून तिचा मानसिक छळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण डोंबिवली शहरात खळबळ उडाली असून, महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. संतापजनक बाब म्हणजे, ज्या ठिकाणी मुलांच्या भविष्याची जडणघडण होते, त्याच ठिकाणी एका महिला शिक्षिकेचा विनयभंग झाल्याने पालक आणि स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे. पोलिसांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत आरोपीला ताब्यात घेतले असून अधिक तपास सुरू केला आहे.

**पोलीस कारवाई आणि ट्रस्टीची भूमिका**



घटनेचे गांभीर्य ओळखून मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे आपल्या फौजफाट्यासह तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आंदोलकांना शांत केले आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळवून शाळेत सुरक्षा व्यवस्था तैनात केली. पोलिसांनी शाळेचे ट्रस्टी शिवा अय्यर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्या मुलाबाबत विचारणा केली असता, त्यांनी तपासात पूर्ण सहकार्य दर्शवले. ट्रस्टींनी स्वतः आपल्या मुलाला पोलिसांच्या स्वाधीन केले, ज्यानंतर पोलिसांनी सरवना अय्यर याला ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेले. पोलिसांनी या प्रकरणातील तांत्रिक पुरावे गोळा करण्यासाठी संबंधित मोबाईल आणि त्यातील चॅट्स तपासण्याचे काम सुरू केले असून, पीडित शिक्षिकेचा सविस्तर जबाब नोंदवून योग्य त्या कलमान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया राबवली जात आहे.

या धक्कादायक घटनेवर प्रतिक्रिया देताना ट्रस्टी शिवा अय्यर यांनी स्पष्ट केले की, कायदा सर्वांसाठी समान असून जर त्यांचा मुलगा दोषी आढळला तर त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई व्हावी, अशीच त्यांची इच्छा आहे. या घटनेने शैक्षणिक वतुर्ळात मोठी खळबळ उडाली असून शाळांमधील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शाळेतील इतर कर्मचारी आणि शिक्षिकांनी देखील या निंदनीय प्रकाराचा निषेध केला असून अशा विकृत प्रवृत्तींना आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी केली आहे. सध्या मानपाडा पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, यापूर्वीही आरोपीने अशा प्रकारे कोणाला त्रास दिला होता का, याचीही पडताळणी केली जात आहे.

## भाजप नगरसेवकाच्या मुलाने अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण केले
## अश्लील व्हिडिओ बनवून व्हायरल करण्याची दिली धमकी

■मुंबई। प्रतिनिधी,

गोव्यात लाज आणणारी घटना घडल्याचे वृत्त आहे. भाजप नगरसेवकाच्या मुलाने अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्याचे व्हिडिओ बनवून व्हायरल केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला. या प्रकरणात दोन मुली बळी ठरल्याची माहिती समोर आली. पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. या घटनेनंतर परिसरात संतापाची लाट उसळल्याची माहिती आहे. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून, पुढील तपास गुन्हे शाखेकडे पाठवण्यात आला. संबंधित प्रकरण गोव्यातील कुशावती जिल्ह्यातील कुडचोरेम भागातील असल्याची माहिती आहे.

**भाजप नगरसेवकाच्या मुलावर मुलींचे अश्लील व्हिडिओ बनवल्याचा आरोप**

संबंधित तरुण हा गोव्याचे भाजपचे नगरसेवक सुशांत नाईक यांचा मुलगा सोहम नाईक असल्याचे सांगितलं जात आहे. या प्रकरणात त्याने अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर प्रसारित केल्याचा आरोप आहे. दोन अल्पवयीन मुलींनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या खुलाशाने परिसरात एकच खळबळ उडाल्याचं चित्र आहे, या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाईची मागणी केली जात आहे.

**आरोपीविरुद्ध पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला**

पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपीविरुद्ध पॉक्सो कायदा आणि गोवा बाल कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती आहे. अशातच, या व्यतिरिक्त भारतीय दंड संहिता आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलमांखाली गुन्हा दाखल केला. कायद्यानुसार, आरोपीवर मुलांचे लैंगिक शोषणासह गंभीर आरोप करण्यात आले. पोलिसांनी सांगितलं की, संबंधित प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तपास केला जात आहे. दरम्यान पोलिसांनी आरोपीला 22 मार्च रोजी अटक केली.



**अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्याने परिसरात तणाव**

तसेच 21 मार्च रोजी, अल्पवयीन मुलींचे अश्लील व्हिडिओ व्हायरल झाल्याने परिसरात तणाव निर्माण झाला. या घटनेनंतर, स्थानिक रहिवाशी मोठ्या संख्येनं पोलीस ठाण्याबाहेर जमले आणि त्यांनी आंदोलन सुरु करण्यात आले. पोलिसांनी सुरुवातीला कारवाई करण्यास विलंब केल्याचा त्यांनी आरोप केला. मात्र, वाढत्या दबावाखाली पोलिसांनी आरोपीला अटक केली. दरम्यान, पीटीआयच्या वृत्तानुसार, औपचारिक तक्रार दाखल करण्यात आल्याने सुरुवातीला आरोपीला ताब्यात घेतलं नाही. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर आणि संतप्त झालेल्या लोक पोलीस ठाण्याबाहेर जमले होते, यामुळे पोलिसांवर दबाव वाढला होता. नंतर पोलिसांनी 22 मार्च रोजी आरोपीला अटक केली.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# ‘राज्यात किती कावळे आहेत?’



**मुंबई उच्च न्यायालयाने सर्व फेरीवाल्यांची सखोल पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. बेकायदा बांगलादेशी फेरीवाल्यांना मायदेशी पाठवण्याचे आदेश महत्त्वाचे आहेत. अधिकृत फेरीवाल्यांव्यतिरिक्त इतर सर्व फेरीवाले बेकायदा ठरतील.**

बिरबलाच्या अनेक चातुर्यकथा प्रसिद्ध आहेत. ‘आपल्या राज्यात किती कावळे आहेत?’, असा प्रश्न एकदा अकबर बादशहाने बिरबलास केला. त्यावर बिरबलाने काही एक आकडा सांगितला. ‘प्रत्यक्ष आकडा त्यापेक्षा कमी–अधिक भरल्यास काय?’ या बादशहाच्या प्रश्नावर बिरबलाचे चतुर उत्तर : ‘कमी भरल्यास आपल्या राज्यातील कावळे बाहेर गेले आहेत, आणि अधिक भरल्यास बाहेरच्या राज्यातील कावळे आपल्या राज्यात आले आहेत, असे खुशाल समजावे’. बिरबलाच्या या उत्तराने बादशहाचे समाधान झाले असेलही कदाचित; पण, मुंबईतील फेरीवाल्यांच्या आकड्याच्या संदर्भात आणि त्यातही बेकायदा फेरीवाल्यांवरील कारवाईच्या संदर्भात मुंबई महानगरपालिका आणि पोलिस यांच्या वतीने जी उत्तरे देण्यात येत आली आहेत, त्यावर मुंबई उच्च न्यायालयाचे समाधान झाले नसावे. म्हणूनच, ‘मुंबईतील बेकायदा बांगलादेशी फेरीवाल्यांसह सर्वच फेरीवाल्यांची सखोल पडताळणी करा,’ असे आदेश न्यायालयाने मुंबई महापालिका व पोलिसांना दिले आहेत. ‘या पडताळणीत बांगलादेशी वा इतर विदेशी फेरीवाले मुंबईत बेकायदा राहात असल्याचे आढळल्यास त्यांची त्यांच्या मायदेशी रवानगी करा,’ हा या आदेशातील कळीचा मुद्दा. हे असे आदेश दिल्याबद्दल मुंबईकर आणि मुंबईच्या बाहेरून रोज नोकरी–व्यवसायासाठी मुंबईत येणारे लक्षावधी नागरिक उच्च न्यायालयाचे आभार मानतील हे नक्की. पूर्वीच्या काळच्या संस्कृती नद्यांच्या काठाने वाढल्या, तद्वत आत्ताच्या शहरी संस्कृती या रेल्वेमार्गाच्या काठाने वाढल्या नि फोफावल्या. यात फेरीवाला हा घटक कमालीच्या वेगाने वाढत गेला. हा घटक रोजच्या जगण्यासाठी अत्यंत आवश्यकच. मात्र त्यास काही नियमनही गरजेचे. पण, आपल्याला एकूणच नियमनाचे वावडे. आणि ज्यांच्यावर नियमनाची जबाबदारी अशा ‘व्यवस्थां’चे वेगळेच साटेलोटे चाललेले. त्यातून केवळ मुंबईतच नव्हे, तर ठाणे, पुणे, नाशिक, नागपूर अशा अनेक मोठ्या शहरांत बेकायदा फेरीवाल्यांची समस्या उभी राहिली. फेरीवाल्यांनी व्यापलेले पदपथ, त्यांची बेकायदा कच्ची–पक्की बांधकामे, त्यांची संघटित दादागिरी, परिणामी वाहनांची कूर्मगती... या सगळ्या चक्रव्यूहातून कसेबसे वाट काढणारे नागरिक हे रोजचे चित्र. मुंबईचे उदाहरण घेतले तर ९९ हजार ४३५ फेरीवाले अधिकृतरीत्या व्यवसाय करू शकतात, असे न्यायालयीन आदेश सांगतात. मात्र प्रत्यक्षात आज मुंबईतील फेरीवाल्यांची संख्या तीन लाख २६ हजार ६०४ फेरीवाले इतकी असावी, असे सांगण्यात येते. मुद्दा निव्वळ संख्येचा नाही, तर त्यातून फोफावणाऱ्या बेदरकार संस्कृतीचा, कायदा–सुव्यवस्थेचा आणि महसुली नुकसानीचा देखील आहे. त्यामुळेच उच्च न्यायालयाने दिलेले आदेश महत्त्वाचे ठरतात. सोबतच, मुंबई महापालिकेने निवडणुकीद्वारे निवडलेली शहर फेरीवाला समिती वैध असल्याचा निवार्ळाही तितकाच महत्त्वाचा. या आदेशानंतर फेरीवाला कायद्याची अंमलबजावणी होण्यातील अडथळे दूर होतील, ही आशा. सामान्यांच्या दृष्टीने या आदेशातील सर्वाधिक अधोरेखित झालेला मुद्दा बेकायदा बांगलादेशी फेरीवाल्यांचा. भारतात बेकायदा राहणाऱ्या बांगलादेशींचा मुद्दा पार अगदी पश्चिम बंगाल, ईशान्येकडील राज्यांपासून ते मुंबईसह महामुंबईपर्यंत अतिशय संवेदनशील झालेला आहे. त्यास धार्मिक रंग आहे का? तर आहेच. आणि आत्ताच्या राजकीय भोवतालात तो गडददेखील झालेला आहे. पण कुणी त्यास धार्मिक रंग देत असेल, म्हणून ती समस्या गौण ठरत नाही, याची खूणगाठ सगळ्यांनीच मनाशी बांधायला हवी. आणि म्हणूनच वेळप्रसंगी कठोर पावले उचलून ती समस्या सोडवायलादेखील हवी. पण दुर्दैवाने अशा प्रकारच्या विषयांवर दोन्ही बाजूंनी राजकारण होत राहते, सुरक्षित व हक्काच्या मतपेढीच्या अंगाने अ–विचार होतो नि मूळ मुद्द्याला भलते वळण लागते, हे अनेकदा दिसून आले आहे. तसे आता होऊ नये. या सगळ्यांत एक महत्त्वाची गोष्ट सगळ्यांनीच ध्यानात ठेवावी अशी. न्यायालयाने दिलेल्या आदेशांनुसार सर्वच फेरीवाल्यांची पडताळणी होईल; त्यात ‘बेकायदा बांगलादेशी’ समजून येतील; तसेच ‘बेकायदा बिगर बांगलादेशी’देखील. म्हणजेच, ९९ हजार ४३५ फेरीवाले वगळता इतर सारेच फेरीवाले हे ‘बेकायदा’च असतील. हे सारेच बेकायदा फेरीवाले हटवण्यास न्यायालयाने सांगितलेले आहे. त्यामुळे त्यांच्यावरही कारवाई होणे अनिवार्य, अपरिहार्य. त्यातही उद्या कुणी राजकारण आणू नये; अन्यथा न्यायालयाच्या आदेशाचा मूळ हेतूच केरात जायचा. बिरबल–बादशहाच्या कथांमधील बिरबलाची उत्तरे चतुर असतीलही; पण बांगलादेशींच्या या मुद्द्यावर तसली चतुर उत्तरे कामाची नाहीत. येथे हवी आहे ती ठोस कारवाई. ती व्हावी, ही अपेक्षा.

# युद्ध लवकर थांबणे हेच जगाच्या हिताचे!



इराण-इस्त्रायल संघर्ष आणि अमेरिका-भारत व्यापार करारातील स्थगिती या दोन्ही घडामोडींनी जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्थेवर तीव्र परिणाम घडवले आहेत. त्यातून वाढती महागाई, व्यापारातील अनिश्चितता आणि आर्थिक तणाव स्पष्टपणे समोर येत आहेत. मध्यपूर्वेतील संघषार्मुळे ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होत असून कच्च्या तेलाच्या किमती वाढत आहेत. त्यामुळे भारतासारख्या देशांमध्ये इंधनदर आणि जीवनावश्यक वस्तू महाग होत आहेत. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोनासदृश्य परिस्थितीला तयार राहण्याचे आवाहन केले आहे.

अमेरिका–इस्त्रायल–इराण संघर्षाने अलीकडील काळात अत्यंत गंभीर आणि धोकादायक वळण घेतले असून या संघर्षातील ताज्या घडामोडींनी केवळ मध्यपूर्वेतील राजकीय संतुलन ढवळून काढले नाही तर जागतिक अर्थव्यवस्था, ऊर्जा सुरक्षाव्यवस्था आणि भारतासारख्या विकसनशील देशांवरही व्यापक व दूरगामी परिणाम घडवून आणले आहेत. इस्रायलने केलेल्या अचूक आणि लक्ष्यभेदी लष्करी कारवाऱ्यांमध्ये इराणच्या तीन महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचा मृत्यू झाल्याचे इराणने अधिकृतपणे मान्य केल्याने परिस्थिती अधिकच तणावपूर्ण बनली आहे. या मृतांमध्ये अली लारोजानो आणि रेजा सुलेमानी यांसारख्या प्रभावी व्यक्तींचा समावेश असल्याचे समजते. ज्यामुळे इराणच्या राजकीय आणि लष्करी नेतृत्वाला मोठा धक्का बसला आहे. या घटनेच्या प्रत्युत्तरादाखल इराणने इस्रायलवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्रांनी हल्ले चढवून आपली आक्रमक भूमिका स्पष्ट केली आहे. इराणचा दावा आहे की त्यांनी इस्रायलची अत्याधुनिक ‘आयर्न डोम’ संरक्षण प्रणाली भेदण्यात यश मिळवले आणि तेल अवीवसारख्या महत्त्वाच्या शहरांतील इमारतीवर अचूक निशाणा साधला. या दाव्यामुळे इस्रायलच्या अभेद्य मानल्या जाणाऱ्या संरक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या हल्ल्यांमुळे शहरी पायाभूत सुविधांवरही गंभीर परिणाम झाल्याचे चित्र दिसून येत आहे. दरम्यान, इराणने आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्थेला कळविले आहे की, त्यांच्या वीज निर्मिती करणाऱ्या अणुप्रकल्पांपैकी एका प्रकल्पाला नुकसान झाले आहे. ही बाब अत्यंत चिंताजनक मानली जात असून अणुप्रकल्पांवरील कोणतीही हानी केवळ स्थानिक पातळीवर मर्यादित राहत नाही तर ती प्रादेशिक तसेच जागतिक पर्यावरणीय संकटाचे कारण ठरू शकते. त्यामुळे या संघर्षाचे स्वरूप पारंपरिक युद्धापासून संभाव्य अणुजोखमीकडे झुकत असल्याचे संकेत मिळत आहेत. या पार्श्वभूमीवर अमेरिकेची भूमिकादेखील महत्त्वाची ठरत आहे. विशेषतः राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी क्यूबा देश ताब्यात घेण्याबाबत व्यक्त केलेले विधान हे जागतिक स्तरावर नव्या वादाला तोंड फोडणारे ठरले आहे. अशा प्रकारची आक्रमक भाषा केवळ मध्यपूर्वेतील तणाव वाढवण्यापुरती मर्यादित राहत नाही तर लॅटिन अमेरिकेतील राजकीय स्थैर्यावरही परिणाम करू शकते. याचवेळी इस्रायल आणि अमेरिकेने असा दावा केला आहे की, त्यांनी इराणविरुद्धचे युद्ध जवळपास जिंकले असून इराणची बॅलेस्टिक क्षेपणास्त्र क्षमता मोठ्या प्रमाणावर निष्प्रभ करण्यात यश मिळवले आहे. या दाव्यांमुळे युद्धबंदीची शक्यता वर्तवली जात असली तरी प्रत्यक्षात परिस्थिती अद्याप अस्थिरच आहे. इराणकडून होणाऱ्या संभाव्य प्रत्युत्तरात्मक कारवायांची तीव्रता लक्षात घेता हा संघर्ष थांबण्याऐवजी अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या जागतिक संघषार्चा थेट परिणाम भारतावर, विशेषतः महाराष्ट्रासारख्या राज्यांवर, कर्ज आणि महागाईच्या स्वरूपात जाणवत आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीत सुमारे 3 लाख टन एलपीजी घेऊन येणारी भारताची 6 जहाजे युद्धजन्य परिस्थितीमुळे अडकून पडली आहेत. ही सामुद्रधुनी जागतिक तेल आणि वायू वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे येथे निर्माण झालेला अडथळा भारताच्या ऊर्जा सुरक्षेसाठी गंभीर आव्हान ठरत आहे. याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रात एलपीजी सिलेंडरच्या किमतीत सुमारे 60 रुपयांनी वाढ झाली आहे, तर गहू आणि डाळीसारख्या अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीत किलोमागे 2 ते 3 रुपयांची वाढ नोंदवली गेली आहे. ही वाढ सामान्य नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करणारी असून विशेषतः मध्यमवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांसाठी अधिकच त्रासदायक ठरत आहे. या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सरकारने एलपीजी उत्पादन 9000 मेट्रिक टनांवरून 11,000 मेट्रिक टनांपर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय तात्पुरता दिलासा देणारा असला तरी दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षिततेसाठी अधिक व्यापक आणि शाश्वत धोरणांची गरज अधोरेखित करतो. याचदरम्यान ‘नंदादेवी’ ही भारताची दुसरी एलपीजी वाहक नौका सुरक्षितपणे गुजरातच्या किर्नायावर पोहोचल्याने काही प्रमाणात दिलासा मिळाला असला तरी एकूण पुरवठा साखळीतील अनिश्चितता कायम आहे.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर जागतिक बाजारपेठेत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ, पुरवठा साखळीतील अडथळे आणि गुंतवणूकदारांचा कमी झालेला आत्मविश्वास यामुळे शेअर बाजारात मोठ्या प्रमाणावर घसरण झाली आहे. जागतिक स्तरावरील प्रभावी उद्योगपती आणि आर्थिक शक्तिकेंद्रे युद्ध थांबवण्यासाठी किती प्रमाणात राजकीय दबाव आणतात, यावर भविष्यातील अनेक घडामोडी अवलंबून राहतील. एकंदरीत पाहता, इराण इस्त्रायल संघर्ष हा केवळ दोन राष्ट्रांमधील लष्करी संघर्ष राहिलेला नसून तो एक व्यापक जागतिक संकट म्हणून उभा राहत आहे. ऊर्जा सुरक्षेपासून अन्नधान्याच्या किमतीपर्यंत, शेअर बाजारापासून आंतरराष्ट्रीय राजकारणापर्यंत विविध स्तरांवर त्याचे परिणाम जाणवत आहेत. त्यामुळे या संघषार्चे तातडीने आणि शांततामय मार्गाने निराकरण होणे हे केवळ संबंधित देशाची गरज नसून संपूर्ण जगासाठी अत्यावश्यक बनले आहे. अमेरिका–भारत व्यापार कराराला मिळालेली स्थगिती केवळ राजनैतिक किंवा न्यायालयीन प्रक्रियेतील अडथळा नसून तिचे परिणाम अत्यंत व्यापक आणि बहुआयामी स्वरूपाचे असल्याचे सध्याच्या आर्थिक आणि व्यापारी परिस्थितीवरून स्पष्टपणे जाणवते. या स्थगितीमुळे महागाई, निर्यात, शेती, उद्योग, ऊर्जा सुरक्षा आणि जागतिक व्यापार व्यवस्थेतील स्थैर्य यावर एकाच वेळी परिणाम होत असल्याचे चित्र दिसून येते, आणि या सर्व घटकांचा परस्पर संबंध लक्षात घेतल्यास जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चिततेची पातळी किती वाढली आहे, हे प्रकर्षाने समोर येते, प्रस्तावित करारानुसार भारत आणि अमेरिका यांच्यातील अतिरिक्त 25 टक्के आयात शुल्क हटवण्याची आणि परस्पर आयात शुल्क सुमारे 18 टक्क्यांपर्यंत कमी करण्याची रूपरेषा निश्चित करण्यात आली होती. या निर्णयामुळे द्विपक्षीय व्यापार अधिक सुलभ होईल, उद्योगांना स्थिरता मिळेल आणि ग्राहकांना तुलनेने कमी किमतीत वस्तू उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात होती. मात्र, अमेरिकन न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे हा करार अनिश्चित काळासाठी लांबणीवर पडल्याने संपूर्ण टॅरिफ संरचनेत गोंधळ निर्माण झाला आहे.

विशेषतः कापड, दागिने आणि अभियांत्रिकी वस्तू यांसारख्या निर्यातप्रधान क्षेत्रांना या अनिश्चिततेचा सर्वाधिक फटका बसत आहे. अमेरिकन बाजारपेठ ही या क्षेत्रांसाठी अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे आयात शुल्कातील कोणतीही अनिश्चितता थेट उत्पादन खर्च, पुरवठा साखळी नियोजन आणि नफा यावर परिणाम करते. परिणामी उद्योगांना स्पर्धात्मक दर राखणे कठीण होत असून त्याचा परिणाम अखेरीस महागाईच्या स्वरूपात ग्राहकांवर होतो. वस्त्रोद्योगाच्या बाबतीत ही समस्या अधिक तीव्र आहे, कारण भारताला बांगलादेश आणि व्हिएतनामसारख्या देशांशी थेट स्पर्धा करावी लागत आहे. जर अमेरिकेच्या नव्या कररचनेत भारतावर तुलनेने जास्त शुल्क लादले गेले, तर भारतीय कापड अमेरिकन बाजारात महाग ठरेल आणि निर्यात घटण्याची शक्यता निर्माण होईल. विशेषतः जेव्हा स्पर्धक देशांना सुमारे 17 टक्के शुल्काचा लाभ मिळत असेल आणि भारताला 18 टक्के किंवा त्याहून अधिक शुल्क भरावे लागत असेल, तेव्हा किंमत स्पर्धेत टिकून राहणे कठीण होते. यामुळे उत्पादन घटण्याची, रोजगारावर परिणाम होण्याची आणि देशांतर्गत बाजारात किमती वाढण्याची शक्यता वाढते. याचप्रमाणे हिरे आणि दागिने उद्योगालाही या अनिश्चिततेचा मोठा फटका बसत आहे.

इराण–इस्त्रायल संघर्ष आणि अमेरिका–भारत व्यापार करारातील स्थगिती या दोन्ही घडामोडींनी जागतिक तसेच भारतीय अर्थव्यवस्थेवर तीव्र परिणाम घडवले असून त्यातून वाढती महागाई, व्यापारातील अनिश्चितता आणि आर्थिक तणाव स्पष्टपणे समोर येत आहेत. मध्यपूर्वेतील संघर्षांमुळे ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत होत असून कच्च्या तेलाच्या किमती वाढल्याने भारतासारख्या देशांमध्ये इंधनदर आणि जीवनावश्यक वस्तू महाग होत आहेत, तर त्याचवेळी अमेरिका भारत व्यापार करार लांबल्याने निर्यात क्षेत्रात अस्थिरता निर्माण झाली आहे, ज्यामुळे उद्योगांना स्पर्धात्मकता टिकवणे कठीण जात आहे. कापड, दागिने आणि अभियांत्रिकी क्षेत्रांवर विशेष दबाव निर्माण झाला असून याचा परिणाम उत्पादन, रोजगार आणि बाजारभावांवर होत आहे. दुसरीकडे काही क्षेत्रांना तात्पुरते संरक्षण मिळत असले तरी एकूणच जागतिक आर्थिक व्यवस्थेत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. परिणामी महागाई वाढ, गुंतवणूकदारांचा कमी झालेला आत्मविश्वास आणि पुरवठा साखळीतील अडथळे यामुळे आर्थिक तणाव अधिक गडद होत आहे. परिस्थिती स्थिर होण्यासाठी शांतता, स्पष्ट धोरणे आणि समन्वित जागतिक प्रयत्नांची गरज अधिक अधोरेखित होत आहे.

# आर्थिक समस्येचे सावट




अमेरिकेतील खासगी क्रेडिट फंडांमधून पैसे काढण्यावर निर्बंध आले आहेत. या घडामोडींमुळे जगभरातील आर्थिक बाजारात तणाव निर्माण झाला आहे.

अमेरिकेच्या आर्थिक क्षेत्रातून ज्या बातम्या येत आहेत त्या थोड्याफार प्रमाणात २००८मध्ये घडलेल्या ‘सबप्राइम’ संकटाची आठवण करून देणाऱ्या आहेत. त्यातील काही खासगी क्रेडिट फंडांशी संबंधित आहेत. ज्या कंपन्यांना बँकिंग व्यवस्थेमधून कर्ज मिळत नाही, म्हणजेच बँकिंग व्यवस्थेसाठी या कंपन्या ‘रिस्की’ असतात, अशा कंपन्यांना हे ‘खासगी क्रेडिट फंड’ पैसे देतात. या खासगी क्रेडिट फंडामध्ये गुंतवणूकदारांनी पैसे गुंतवलेले असतात. हे पैसे काढून घेताना या गुंतवणूकदारांना काही निबंर्धांचा सामना करावा लागतो आहे. ब्लू आऊल, ब्लॅक रॉक, ब्लॅक स्टोन, अपोलो ही अमेरिकेतील काही खासगी क्रेडिट फंडांची उदाहरणे. पैसे काढून घेण्यावर निर्बंध लादल्याने या कंपन्यांकडे गुंतवणूकदारांनी जी रक्कम मागितली होती त्याच्या काही टक्के रक्कम मिळेल, असे या फंडांनी जाहीर केल आहे.

हा विषय खरे तर खासगी क्रेडिट फंडांची संबंधित आहे. त्याचा पूर्ण बँकिंग व्यवस्थेवर व्यापक परिणाम होणार नाही, असे कुणास वाटत असेल तर ते तसे नाही. ७ ऑगस्ट २०२५ रोजी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक ‘एक्झिक्युटिव्ह ऑर्डर’ काढली. अमेरिकेमध्ये 401k ही गुंतवणूक आहे. ती गुंतवणूक खासगी क्रेडिट फंडांना वापरता येईल, असे त्या आदेशात म्हटले होते. 401k गुंतवणूक म्हणजे काय? तर आपल्याकडे पगारदार कर्मचाऱ्यांसाठी जशी भविष्यनिर्वाह निधीची व्यवस्था असते, त्याचप्रमाणे अमेरिकेमध्ये पेन्शन फंड, वेल्थ फंड असतो; त्याला 401k असे म्हटले जाते. या पेन्शन फंड किंवा वेल्थ फंडमधील रक्कम खासगी क्रेडिट फंडांना वापरायला परवानगी देण्यात आली. त्यामुळे अमेरिकेतील बड्या बँकर्सनी खासगी क्रेडिट फंड सुरू केला आणि ही गुंतवणूक वापरली. त्याच्यामध्ये ब्लॅक स्टोन, ब्लॅक रॉक यांसारखी मोठी नावे आहेत. त्याचबरोबर जे. पी. मॉर्गन, मॉर्गन स्टॅन्ली हेसुद्धा आहेत. हे सगळेच अमेरिकेतील मोठे बँकर्स आहेत. त्यांनी खासगी क्रेडिट फंडामधून गुंतवणूकदारांना पैसे काढण्यासाठी निर्बंध लादले. याचा अर्थ त्यांच्याकडे आता गुंतवणूकदारांना परत देण्यासाठी पैसे नाहीत किंवा त्यांनी ते अशा ठिकाणी गुंतवले आहेत, की ते लगेच काढून गुंतवणूकदारांना देता येत नाहीत. त्यामुळे गुंतवणूकदार अडचणीत आले आहेत.

आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक गुंतवणूकदारांनी पैसे परत मागितल्याने आम्ही ते देऊ शकत नाही, असे म्हणणे या कंपन्यांनी मांडले आहे. त्यातील ब्लू आऊल कंपनीच्या क्रेडिट फंडातून पैसे काढण्यावर पूर्णच बंदी घातलेली आहे. म्हणजे गुंतवणूकदार या क्रेडिट फंडातून पैसे काढूच शकत नाहीत. म्हणजे या फंडांकडे गुंतवणूकदारांना परत देण्यासाठी आत्ता रोख रक्कम नाही. आणि ही गोष्ट फक्त खासगी क्रेडिट फंडापुरती मर्यादित राहत नाही, कारण त्या खासगी क्रेडिट फंडामध्ये पेन्शन फंड, वेल्थ फंड यांचे पैसे गुंतवलेले आहेत. या गोष्टीचा बँकिंग क्षेत्रावर परिणाम झाल्यास त्याची व्याप्ती वाढू शकते, असे या विषयातील जाणकार सांगत आहेत. या घडामोडींचा परिणाम म्हणून, ब्लॅक रॉक, केकेआर, अपोलो ग्लोबल मॅनेजमेंट, एस मॅनेजमेंट, ब्लू आऊल कॅपिटल, टीपीजी या सर्व कंपन्यांचे शेअर पाच ते सहा टक्क्यांनी घसरले. ‘फिच’ या रेटिंग संस्थेच्या निरीक्षणानुसार अमेरिकेतील खासगी क्रेडिट पोर्टफोलिओचा डिफॉल्ट दर २०२५मध्ये ९.२ टक्के या विक्रमी पातळीवर पोहोचला आहे. सन २०२४मध्ये हा दर ८.१ टक्के होता. जगभरातील १.७ ते दोन ट्रिलियन डॉलर इतक्या आकाराच्या खासगी क्रेडिट बाजारावर सध्या मोठा ताण निर्माण झाला आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर संपूर्ण बँकिंग व्यवस्थेला फटका बसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अमेरिकेतील वाहन उद्योगाशी संबंधित असलेल्या तीन कंपन्यांनी ऑक्टोबर महिन्यात दिवाळखोरी जाहीर केली. फर्स्ट ब्रॅंड्स, ट्राय कलर आणि प्रायमा लेंड या त्या तीन कंपन्या आहेत. फर्स्ट ब्रॅंड्स ही कंपनी वाहन क्षेत्राला लागणारे सुटे भाग बनवते. त्यांच्यावरील कर्जाचे प्रमाण हे त्यांच्या मालमत्तेपेक्षा तीन ते पाच पटीने जास्त झाले असून आर्थिक संकटामुळे ते फेडता येणे शक्य नाही, असे कंपनीने जाहीर केले आहे. ट्राय कलर आणि प्रायमा लेंड या कंपन्या कर्ज पुरवणाऱ्या कंपन्या आहेत. त्यांनी त्यांच्या क्षमतेपेक्षा अधिक कर्जाचे वितरण केले. या दिलेल्या कर्जाची परतफेड न झाल्यामुळे या दोन्ही कंपन्यांना सध्या मोठ्या आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते आहे.

या तीन कंपन्यांनी दिवाळीखोरी जाहीर केल्यानंतर ब्रिटनच्या मध्यवर्ती बँकेचे गव्हर्नर अँड्रू बेली यांनी सन २००८मध्ये आलेल्या सबप्राइम संकटाची आठवण करून दिली. सन २००८मध्ये लेहमन ब्रदर्स, मेरिल लिंच आणि एआयजी या तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केली. त्यानंतर शेअर बाजारात प्रचंड मोठी उलथापालथ झाली. युरोपीय राष्ट्रांनादेखील फार मोठा आर्थिक धक्का बसला. फेडरल रिझर्व्हने घेतलेला ‘सबप्राइम लेंडिंग’चा निर्णय घातक ठरला. सबप्राइम लेंडिंग म्हणजे कर्जासाठीच्या नियमांत शिथिलता आणणे. कर्ज घेणारे जे उत्पन्न दाखवतील तेच योग्य आहे असे गृहीत धरून बँकांनी कर्जे दिली. कर्जे देताना त्याबाबत योग्य ती शहानिशा करण्यात आली नाही. कर्ज परतफेड करण्याची ऐपत नव्हती अशा व्यक्तींनाही कर्जे मिळाली आणि पुढे बँकांची अवस्था वाईट झाली. पुढे तीन–चार वर्षे आर्थिक मंदीला सामोरे जावे लागले. त्यातून बाहेर पडायला बराच वेळ लागला. जेव्हा लेहमन ब्रदर्स, मेरिल लिंच आणि एआयजी यांनी दिवाळखोरी जाहीर केली तेव्हा इतर देशांनी, हे आर्थिक संकट किती मोठे असू शकेल, अशी चिंतायुक्त विचारणा केली होती. त्या वेळी, हे खूप मोठ्या आर्थिक व्यवस्थेचा अतिशय लहान भाग आहे, असे उत्तर अमेरिकेने दिले होते.

आता वाहन क्षेत्रातल्या तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केल्यानंतर अँड्रू बेली यांनी त्या वेळच्या घटनाक्रमाची आठवण करून दिली आहे. तेव्हाही तीन कंपन्यांनी दिवाळखोरी जाहीर केल्यानंतर अमेरिकेने त्याचा व्यापक आर्थिक संकटाशी संबंध नसल्याचे दावे केले होते, याकडे ते लक्ष वेधतात. आत्ताही अमेरिकेत प्रचंड मोठ्या कर्जाची विभागणी करून त्याचे स्वतंत्र हिस्से करण्याच्या प्रक्रिया वेगात सुरू आहेत, असे अँड्रू बेली यांचे म्हणणे आहे.

सन २००८मधील आर्थिक मंदीची झळ जवळजवळ सगळ्या देशांना बसली होती. त्यातही युक्रेन, रशिया, मेक्सिको तसेच युरोपीय देशाना मोठा फटका बसला. या देशांच्या जीडीपीमधे पाच ते सात टक्के घट झाली. अर्थव्यवस्था सुरळीत होण्यासाठी मोठमोठी बेलआउट पॅकेजेस दिली गेली आणि सगळ्या गोष्टी पूर्वपदावर आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले गेले. अमेरिकी अर्थव्यवस्थेला फटका बसला; तरी डॉलर पडला नाही, पण इतर देशांचे चलन मात्र घसरले. आंतरराष्ट्रीय व्यापारात इतर देशांना फटका बसला. आशियाई देशांना त्यामानाने कमी फटका बसला. मात्र आत्ता अमेरिकेत जे सुरू आहे ते पाहता आधीच्या सबप्राइम संकटाची आठवण येते. त्याची पुनरावृत्ती झाली तर अमेरिकेचे व इतरांचे किती आणि काय नुकसान होईल, याचा अंदाज बांधणे आजमितीला तरी कठीण आहे. पण परिस्थिती काळजी वाटण्याजोगी आहे, हे नक्की.



# वेशीवरच्या युद्धकळा

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धाबाबत भारताची नेमकी भूमिका काय, या प्रश्नाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अखेर संसदेतील भाषणाद्वारे उत्तर दिले आहे; त्याचबरोबर या युद्धामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य परिस्थितीचीही जाणीवही देशवासीयांना करून दिली आहे. युद्ध सुरू होऊन तीन आठवड्यांहून अधिक दिवस झाले असून, ती थांबण्याची चिन्हे नाहीत; उलट त्याची व्याप्ती वाढते आहे. परस्परांना धडा शिकविण्यासाठी दोन्ही बाजूंकडून युद्धाची तीव्रता अशीच वाढत राहिल्यास अभूतपूर्व स्थितीला सामोरे जावे लागणार आहे. या परिस्थितीला तोंड देण्याची तयारी ठेवा, हा पंतप्रधानांच्या भाषणाचा मथितार्थ. युद्ध सुरू झाल्यापासून भारताने कळीच्या विषयांवर मौन बाळगल्याची टीका विरोधी पक्षांकडून करण्यात येत होती. त्या पार्श्वभूमीवर मोदी यांनी संसदेच्या व्यासपीठावरून सद्यस्थितीवर भाष्य केले आहे. पंतप्रधानांच्या भाषणामध्ये गेले काही दिवस सुरू असलेल्या संघषार्बाबत चिंता व्यक्त करण्यात आली; तसेच पश्चिम आशियातील देशांच्या प्रमुखांशी केलेल्या चर्चेबाबत माहिती दिली. तणाव कमी करण्याचा आणि संघर्ष संपवण्याचा आग्रह भारताने पूर्वीपासूनच धरला आहे. संघर्षग्रस्त देशांमधील सुमारे एक कोटी भारतीय आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेवर त्यांनी भर दिलाच. त्यासोबत ऊजार्केंद्रे आणि व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांना त्यांनी विरोध केला, त्यामागे भारताची ऊर्जासुरक्षा हा मुद्दा सर्वांत कळीचा आहे. इराणने होर्मुझ सामुद्रधुनी बंद केल्याने भारतासह अन्य आशियाई देशांच्या इंधनपुरवठ्यात खंड पडला आहे. त्यामुळे विशेषतः इंधनवाहक जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी प्रयत्न, ही काळाची गरज आहे. होर्मुझमधून तेलवाहक जहाजांना सुरक्षितता पुरवण्यात अमेरिकादी देशांना यश आलेले नाही. त्यामुळेच सध्या तरी इराणशी चर्चेवर भर देणे शहाणपणाचे आहे. त्या पार्श्वभूमीवर तेलसाठ्यांवरील हल्ल्यांचा मुद्दा उपस्थित करून इराणसोबतच इस्रायल आणि अमेरिकेच्या कारवाईबाबतही मोदी यांनी केलेल्या नाराजीवजा टिप्पणीकडे पाहता येते. याआधी इराणवरील हल्ल्यांबाबत कथित मौन, इराणच्या सर्वोच्च नेत्यांना श्रद्धांजली वाहण्यात विलंब आणि त्यापूर्वीची इस्रायल भेट यांवरून भारताच्या भूमिकेवर टीका झाली होती; त्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी संसदेच्या व्यासपीठावरून मांडलेली भूमिका अधिक संतुलनाकडे जाणारी दिसते. या भाषणापूर्वी एक दिवस त्यांनी इराणचे राष्ट्रपती मसूद पेझेश्कियान यांच्याशी केलेली चर्चाही याच अनुषंगाने महत्त्वाची ठरते. युद्धस्थितीच्या परिणामांचा आणि त्या आघाडीवरील सद्यस्थितीचाही मोदी यांनी आपल्या भाषणात आढावा घेतला. विशेषतः देशाच्या गरजेपैकी साठ टक्के द्रवरूप वायूच्या आयातीमध्ये युद्धामुळे मोठी घट झाली आहे. देशात कच्च्या तेलाचा ५३ लाख टन साठा असून, तो ६५ लाख टनांपर्यंत नेण्याचे प्रयत्न, तेलशुद्धीकरणाच्या क्षमतेतील वाढ, आयातीमधील विविधीकरण, पेट्रोलमध्ये इथेनॉलचे मिश्रण, शाश्वत उर्जास्रोतांच्या पर्यायांबाबत उपाययोजना आणि जहाजांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी राजनैतिक प्रयत्न यांबाबत सरकार उचलत असलेल्या पावलांची त्यांनी माहिती दिली. करोना संकटाची आठवण करून देत मोदी यांनी युद्ध लांबल्यास काय स्थिती होऊ शकते, याविषयी इशाराही दिला आहे. त्या काळात विस्कळित झालेली पुरवठा साखळी अजूनही पूर्वपदावर येऊ शकलेली नाही; याची जाणीव ठेवून साऱ्या यंत्रणेने युद्धपातळीवर काम करण्याची गरज आहे.

**आपल्या चेहऱ्याची काळजी घेताना चेहरा नेहमी सुंदर आणि त्वचा नितळ, चमकदार राहावी, अशी इच्छा केवळ स्त्रियांनाच नाही, तर पुरुषांनाही असते. त्यामुळे 'फेशियल', किंवा फेशियल क्लीनअप व मसाज ही थेरपी लोकप्रिय आहे. चेहऱ्याचे सौंदर्य वाढवण्याबरोबरच चेहऱ्यावरील सुरकुत्या कमी करत त्वचेवरील मृत पेशी, ब्लॅक हेड्स आणि व्हाईट हेड्स नाहीसे करण्याचे काम फेशियल थेरपी करत असते. मात्र ही थेरपी घेताना योग्य काळजी घेतली गेली नाही, तर चेहऱ्याला नुकसान होण्याची शक्यताच अधिक असते. त्यामुळे फेशियल थेरपी निवडताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.**

# फेशियल करताना अशी घ्या काळजी



**काही** लोकांची त्वचा तेलकट असते. अशा व्यक्तींना चेहऱ्यावर मुरुमे अधिक येत असतात. अशा व्यक्तींच्या फेशियल थेरपीसाठी तेलयुक्त क्रीम्स वापरली गेली, तर त्वचा अधिक तेलकट होऊन मुरुमे वाढू शकतात.

तेलयुक्त क्रीम्स वापरली गेल्याने त्वचेवरील रंध्रे बंद होऊन पिंपल्स येण्याचे प्रमाण वाढू शकते. तेलकट त्वचा असणाऱ्या व्यक्तींनी फेशियलसाठी वॉटर बेस्ड क्रीम्सचा वापर करणे चांगले.

फेशियल थेरपीसाठी वापरण्यात येणारे प्रोडक्ट आपल्या नेहमीच्या वापरातील नसून, नवे असल्यास त्याची 'पॅच टेस्ट' करून पाहणे चांगले. या टेस्टद्वारे आपण वापरणार असलेल्या क्रीमचे कोणत्याही प्रकारचे दुष्परिणाम आपल्या त्वचेवर होणार नाहीत याची खात्री आपल्याला करून घेता येते. ही टेस्ट करण्यासाठी थोडेसे क्रीम आपल्या मनगटाच्या आतील बाजूस लावून पाहावे. चोवीस तासांच्या नंतर या क्रीमचा कोणताही दुष्परिणाम जाणवला नाही, तरच हे क्रीम चेहऱ्यावर लावण्यास योग्य आहे, असे समजून त्याचा फेशियल थेरपीसाठी वापर करावा.



फेशियल थेरपी एखाद्या ब्युटी सलोनमध्ये किंवा पार्लरमध्ये जाऊन करणार असल्यास तेथील स्वच्छता, फेशियलच्या दरम्यान वापरण्यात येणारे टॉवेल, नॅपकिन, स्टीमर आणि इतर उपकरणे स्वच्छ असल्याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

जर या वस्तू स्वच्छ आणि निर्जंतुक केलेल्या नसतील तर त्याद्वारे त्वचेला इन्फेक्शन होण्याचा धोका असतो. तसेच फेशियल करताना आपल्यासाठी वापरण्यात येणारे फेशियल कीट संपूर्णपणे नवीन आणि आधीपासून वापरलेली नाही याची खात्री करून घ्यावी.

आजकाल फेशियल कीटमध्ये सर्व प्रसाधने लहान लहान पाऊचेसमध्ये उपलब्ध असल्याने प्रोडक्ट आधी वापरले गेले आहे किंवा नाही याची सहज खात्री करून घेता येते.

फेशियलसाठी वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रसाधानांमध्ये किंवा क्रीम्समध्ये अनेक प्रकारची रसायने असतात. या रसायनांमुळे त्वचा कोरडी होणे, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लालसर होणे, अशा समस्या उद्‌भवू शकतात. त्यामुळे फेशियलसाठी शक्यतो संपूर्णपणे नैसर्गिक वस्तूंचा वापर करणे केव्हाही चांगले. फेशियल थेरपी केल्यानंतर उन्हामध्ये बाहेर पडणे किंवा साबणाचा वापर टाळावा.

फेशियल थेरपीनंतर त्वरित सौंदर्यप्रसाधनांचा वापरही करू नये. फेशियल केल्यानंतर त्वचेची रंध्रे खुली असतात. त्यामुळे सौंदर्य प्रसाधानांमधील रसायने या रंध्रांच्या वाटे त्वचेच्या आत शिरून त्वचेचे नुकसान करू शकतात.

फेशियलनंतर चेहरा धुण्यासाठी साबण किंवा फेसवॉशचा वापर न करता केवळ थंड पाण्याने चेहरा धुवावा.

# घरचा वैद्य
## जाणून घ्या ५ उपाय

▮ **कांदा** – कानाच्या वेदनेमुळे त्रस्त आहात, तर घाबरण्यासारखे काही नाही. कांद्याच्या रस काढून कापसाच्या मदतीने कानात दोन ते तीन थेंब टाका. काही वेळातच आराम मिळेल.



▮ **हळद** – शारीरिक वेदनांपासून मुक्ती मिळवण्यासाठी गरमागरम दुधात हळद मिसळून सेवन करा. याव्यतिरिक्त तेल आणि हळद गरम करून शरीर-ावर लावल्यानेही लाभ मिळेल.

▮ **लसूण** – हे अँटीबॅक्टेरिअल आणि अँटी इंफ्लेमेटरी तत्त्वाने भरपूर औषध आहे, ज्याने उष्णताही प्राप्त होते. शारीरिक वेदनेत लसूण सर्वोत्तम विकल्प आहे. याव्यतिरिक्त कानात वेदना होत असल्यास लसणाच्या तेलाचे काही थेंब टाकल्याने आराम मिळतो.

▮ **लवंग** – दातदुखीवर लवंग सर्वोत्तम उपाय आहे. भाजलेल्या लवंगाची पेस्ट किंवा लवंग तेल कापसाने दाताला लावल्याने वेदनांपासून मुक्ती मिळेल.

▮ **दालचिनी** – याने विशेषतः महिलांना मासिक पाळीदरम्यान होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळते. अधिक रक्तस्राव होत असल्यास दालचिनी लाभकारी ठरेल. केवळ दालचिनी टाकून चहा बनवा किंवा तयार चहामध्ये दालचिनी पावडर टाकून सेवन करा.



# कोकोनट आईस्क्रीम

**साहित्य** – शहाळ्याची मलाई - १ कप, नारळाचे पाणी- १/२ कप, कंडेन्स्ड मिल्क - १ कप, व्हॅनिला इसेन्स - १/२ चमचा, व्हिपिंग क्रीम - १ कप, पिठी साखर - २ चमचे

**कृती** – मिक्सरच्या भांड्यात शहाळ्याची मलाई आणि नारळाचे पाणी घालून त्याची जाडसर पेस्ट बनवून घ्या. दुसऱ्या भांड्यात व्हिपिंग क्रीम फेटून घ्या. त्यात तयार नारळाची पेस्ट घाला. आता त्यात कंडेन्स्ड मिल्क, व्हॅनिला इसेन्स आणि साखर घालून पुन्हा ७- ८ मिनिटे फेटून घ्या. मिश्रणात थोडे शहाळ्याच्या मलाईचे बारीक तुकडे घालून मिक्स करून घ्या. हे मिश्रण एका हवाबंद डब्यात ओतून त्यावर ८-१० तास किंवा रात्रभर फ्रीझरमध्ये गोठवा. तुमचे थंडगार टेंडर कोकोनट आईस्क्रीम तयार आहे.

# नाचणी खाण्याचे सहा गुणकारी फायदे



साधारणपणे प्रत्येक घरामध्ये ज्वारी, बाजरी किंवा तांदळाची भाकरी करण्यात येते. मात्र, नाचणीची भाकरी फार क्वचित वेळा केली जाते. खरं तर नाचणी अत्यंत पौष्टिक असून शरीरासाठी अत्यंत उपयोगी आहे. विशेष म्हणजे नाचणी केवळ भाकरीपूरतीच मर्यादित नसून वेगवेगळे पदार्थ करून तिचा आहारात समावेश करता येऊ शकतो. त्यामुळे चला तर आज जाणून घेऊयात नाचणी खाण्याचे फायदे...

▮ नाचणीमुळे वजन नियंत्रणात राहते.

▮ पोटदुखी, अपचन तक्रारी दूर होतात.

▮ अशक्तपणा दूर होतो.

▮ कंबर दुखत असल्यास नाचणीची पेज प्यावी.

▮ शरीरावर फोड आल्यास ते फोडण्याकरिता नाचणीच्या पिठाचे पोटीस बांधावे.

▮ शरीरातील साखरेचे प्रमाण नियंत्रणात राहते.

# पाय सुंदर बनवण्यासाठी काही टीप्स

**काही लोकांची त्वचा खूप कोमल आणि मुलायम असते. मात्र याउलट काही लोकांची त्वचा खूप प्रयत्न केल्यावरही कोरडीच असते. पायाच्या कोरड्या त्वचेवरील उपचाराबाबत काही टीप्स ...**



पायाच्या कोरड्या त्वचेमुळे तुम्हाला त्रास होत असेल तर काळजी घेणे आवश्यक आहे. कोरड्या त्वचेसाठी केवळ क्रीम पुरेसे नाही तर साफसफाईकडेही लक्ष देण्याची गरज असते. पायाची कोरडी त्वचा मुलायम करण्याआधी हे लक्षात घ्या की, तुम्ही कधीही उघड्या पायांनी राहू नका, पायांत नेहमी बूट-चप्पल इत्यादी घाला. पायांची योग्यप्रकारे साफसफाई करा.

वेळोवेळी पेडिक्योर करत राहणे पायाच्या त्वचेला नरमपणा आणते. आंघोळ करताना पायांना व्हॅसलिन, तेल इत्यादी लावावे. शिवाय बाहेर जाताना पायांवर चांगल्या क्वालिटीचे क्रीम लावावे. ज्यामुळे पाय मुलायम राहतात.

पायाचा कोरडेपणा थांबवण्यासाठी दररोज रात्री पाय चांगल्या प्रकारे धुऊन क्रीम लावून झोपावे. त्यामुळे पाय कोमल राहतील. पायांची त्वचा मुलायम होण्यासाठी आणि संक्रमण टाळण्यासाठी व्हिटॅमिन 'ई' युक्त जैतून तेल वापरावे. जैतून तेल अँटीऑक्सिडंट्सने भरपूर असते, जे त्वचेला मृदू बनवते.





व्हिटॅमिन आणि प्रोटीनयुक्त खाद्यपदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. पायांच्या त्वचेसह पायांच्या नखांचीही देखभाल खूप आवश्यक आहे. अशात तुम्ही त्वचेचा नरमपणा कायम ठेवण्यासाठी किमान पंधरा दिवस पेडिक्योर करा. पायांना जास्त गरम पाण्यांनी धुऊ नये. एवढे करूनही तुमची त्वचा कोरडीच राहिली तर तुम्ही स्किन स्पेशालिस्टकडून उपचार करावेत.

पाय सांभाळणे, त्यांच्याकडे नियमित लक्ष देणे हे महत्त्वाचे आहे. पायाची नखे कापताना ती बोटांलगोलग न कापता थोडे अंतर ठेवून कापली पाहिजेत. त्वचा कोरडी होत असेल तर त्यावर त्वचा मुलायम करणारी औषधे किंवा तेल चोपडले पाहिजे. पायाला भोवरी असेल तर ती काढून घेतली पाहिजे.

स्लिपर किंवा अर्धा अधिक पाय उघडा ठेवणाऱ्या चपला वापरण्याऐवजी बूट वापरण्याचा प्रयत्न केला पाहिजे. पायाच्या संवेदना कमी झाल्या तर नियमितपणे पाय तपासायला हवेत.

पायाची खालची बाजू आपल्याला नीट दिसत नाही म्हणून प्रसंगी पायाखाली आरसा धरून हे केले पाहिजे. कुठे जखम आढळली तर ती गोष्ट त्वरित डॉक्टरांच्या नजरेस आणून दिली पाहिजे.

# तोंडाला चव नाहीये? मग आहारात करा चिकूचा समावेश

**सर्वात** गोड फळ कोणतं? असा प्रश्न विचारला तर साहजिकच चिकू आणि सीताफळ ही दोन नावं समोर येतील. त्यातील चिकूमध्ये नैसर्गिक साखरेचं प्रमाण जास्त असतं त्यामुळे हे फळ अनेकांना आवडतं. भारतात गुजरात, बिहार, बंगाल, उत्तर प्रदेश तर महाराष्ट्रात पुणे, कोकण, खान्देश, सुरत, ठाणे या ठिकाणी चिकूची लागवड मोठ्या प्रमाणात केली जाते. त्यामुळे बाजारात कोणत्याही ऋतूमध्ये चिकू सहज मिळतो. चवीला जसा हा चिकू गोड असतो तसेच त्याचे काही फायदेदेखील आहेत. त्यामुळे चिकू खाण्याचे फायदे कोणते ते पाहुयात.

▮ चिकूमध्ये फलशर्करा असते. त्यामुळे थकवा जाणवल्यास चिकू खावा.

▮ अरुची, मळमळ आम्लपित्त, अतिसार या आजारांमध्ये उपयक्त आहे.

▮ रक्त दाब कमी असणाऱ्या व्यक्तींनी चिकू खावा.

▮ चिकू खाल्ल्याने आतड्यांची कार्यक्षमता वाढून व ती सुदृढ बनतात.

▮ वारंवार चक्कर येणं, शरीरातील साखर कमी होणं अशा तक्रारी असतील तर चिकू खावा.

▮ तापामुळे तोंडाची चव गेल्यास चिकू खावा.

▮ चिकूचं सेवन केल्यामुळे शौचास साफ होते.

▮ जुलाब, ताप असल्यास चिकू खावा.

**सावधानता** –

▮ मधुमेह असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्याने चिकू खावा.

▮ कच्चा चिकू कधीच खाऊ नये.



# पोटात जंत किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास दररोज हे खा

आपण हे ऐकलेच असणार की, दररोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरला पळवून लावा. म्हणजे दररोज एक सफरचंद खाल्ल्याने आपण डॉक्टरांच्या फेऱ्यांपासून म्हणजे आजारांपासून लांब राहतो. कॅल्शियम, फायबरसह अनेक पौष्टिक घटकांनी समृद्ध असलेल्या सफरचंदाचे सेवन केल्याने आपण निरोगी राहतो. यासह हे आपल्या पचनक्रियेला देखील चांगले ठेवते. पचन क्रिया चांगली असणे म्हणजे आपले शरीर बऱ्याच रोगांपासून संरक्षित राहते आणि आपण स्वतःला ताजेतवाने आणि निरोगी अनुभवाल.

▮ सफरचंदाचे नियमित सेवन केल्याने आपली प्रतिकारकशक्तीदेखील वाढते. चला तर मग आपण सफरचंदाच्या फायद्यांबद्दल बोलू या.

▮ सफरचंद खाणं आरोग्यास खूप फायदेशीर आहे. यामुळे आरोग्याच्या अनेक समस्यांवर मात करता येते. पोटात जंत झाले असल्यास तर रुग्णाला दररोज दोन सफरचंद खायला द्या किंवा त्याला दररोज एक ग्लास ताज्या सफरचंदाचा रसदेखील देऊ शकता. यामुळे पोटातील जंत मरतात आणि शौचास साफ होते.

▮ सफरचंदाचे सेवन केल्याने अनेक रोग दूर राहतात. ज्या लोकांना डोकेदुखी, चिडचिड, अशक्तपणा किंवा विसर पडण्याची सवय असल्यास, त्यांनी जेवण्यापूर्वी दोन ताज्या सफरचंदाचे सेवन केले पाहिजे. अशा रुग्णांनी सामान्य चहा किंवा कॉफीचे सेवन न करता फक्त सफरचंदाचा चहा प्यावा.

▮ ज्या लोकांचे हृदय कमकुवत आहे किंवा हृदयाचे ठोके कमी किंवा जास्त होत असल्यास, त्यांनी चांदीचे वर्क लावलेल्या सफरचंदाच्या मोरावळ्या (मुरंबा)चे सेवन केले पाहिजे.

▮ सफरचंदामध्ये असलेले फायबर लठ्ठपणा कमी करण्यास उपयुक्त आहे, ज्यामुळे एखादी व्यक्ती इतर आजाराला बळी पडण्यापासून वाचते. अनिद्रेच्या उपचारातही सफरचंद उपयोगी आहे.

▮ आपणास रात्री झोप न येत असल्यास किंवा मध्यरात्री जाग आल्यावर पुन्हा झोप लागत नसल्यास झोपण्यापूर्वी एका सफरचंदाचा मोरावळा खा आणि त्यावर कोमट दूध प्या. चांगली झोप येईल.

▮ बद्धकोष्ठतेचा त्रास असल्यास दररोज सकाळी उठल्यावर उपाशीपोटी दोन सफरचंद चावून चावून खा. यामुळे बद्धकोष्ठतेचा त्रास नाहीसा होतो. पचनशक्ती कमकुवत झाली असल्यास ती दूर होईल आणि भूक वाढेल. याव्यतिरिक्त सफरचंद खाण्याचे बरेच फायदे आहेत.



# पीसीओएसग्रस्त स्त्रियांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण जास्त, अशी घ्या काळजी

**पॉलिसिस्टिक ओव्हरिअन सिण्ड्रोम (पीसीओएस) या अवस्थेमध्ये अंडाशयांत छोटी पाण्याने भरलेली गळवे (सिस्ट) मोत्याच्या आकारात चिकटलेली असतात. याशिवाय हार्मोन्सचे असंतुलन दिसून येते. पुरुषांमध्ये आढळणाऱ्या हार्मोन्सचे प्रमाण स्त्रियांमध्ये वाढते आणि इन्सुलिनच्या चयापचयावर वाईट परिणाम होतो, मासिक पाळी अनियमित होते व रक्तस्रावही कमी होतो. गेल्या काही वर्षांत पीसीओएस असलेल्या स्त्रियांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. त्यामुळे पीसीओएसकडे एक गंभीर समस्या म्हणून बघणे आणि योग्य वेळी या आजारावर उपचार करणे ही काळाची गरज असल्याचे नोव्हा आयव्हीएफ फर्टिलिटी कन्सल्टंट डॉ. रितू हिंदुजा यांनी म्हटलं आहे.**



**पीसीओएसग्रस्त** स्त्रियांना पुढील आयुष्यात वंध्यत्व, हायपरलीडिमिया, हृदयविकार तसेच हायपरटेन्शन हे विकार होण्याचा धोका अधिक असतो. पीसीओएसने ग्रासलेल्या स्त्रियांमध्ये वंध्यत्वाचे प्रमाण जास्त असते. कारण त्यामुळे अनियमित ओवूलेशन होते किंवा ओव्ह्युलेशन होत नाही. वैद्यकीय मदतीशिवाय गर्भधारणा होणे त्यामुळे कठीण असते.

बैठी जीवनशैली, तणाव, अनियमित व चुकीच्या आहाराच्या सवयी आणि व्यायामाचा अभाव या कारणांमुळे हा आजार होतो. यातून स्थूलत्व, ओव्ह्युलेशनवर परिणाम झाल्याने गर्भधारणेत समस्या, लवकर गर्भधारणा न होणे, गर्भपात होणे आणि गरोदरपणात मधुमेह होणे यांसारख्या समस्या निर्माण होतात. पीसीओएस असलेल्या ज्या स्त्रियांना गर्भधारणा झालेली असते अशा स्त्रियांवर गर्भारपणात खूप काळजीपूर्वक लक्ष ठेवले पाहिजे.

कारण या स्त्रियांना तीन पट जास्त गर्भपाताचा धोका असतो. गर्भारपणातील मधुमेह आणि अकाली प्रसूती हे पीसीओएसचे आणखी काही दुष्परिणाम आहेत; जे गर्भारपणात आढळू शकतात. गर्भारपणात मेटफोर्मीन घेण्याचा सल्ला डॉक्टर घेऊ शकतात, त्यामुळे गर्भपाताची शक्यता कमी होते. पीसीओएस असलेल्या गर्भवती स्त्रीला नियमित व्यायामाची गरज असते.

हलके व्यायाम केल्याने इन्सुलिनचा वापर शरीर करू लागते, त्यामुळे संप्रेरकांचे संतुलन होते आणि वजन नियंत्रित राहते. चालणे आणि हलके व्यायाम हे गर्भवती स्त्रीसाठी सर्वोत्तम व्यायाम प्रकार समजले जातात. पीसीओएस असलेल्या गर्भवती स्त्रीचा आहारसुद्धा महत्त्वाचा आहे. प्रथिने आणि तंतुमय पदार्थ जास्त प्रमाणात घेल्यास गर्भारपणात इन्सुलिनची पातळी नियंत्रित राहते.

मुंबईच्या नोव्हा आयव्हीएफच्या फर्टिलिटी कन्सल्टंट डॉ. रितू हिंदुजा सांगतात, नुकतेच एक ३२ वर्षीय जोडपे मूल होत नसल्याची तक्रार घेऊन उपचाराकरिता आले होते. तीन वर्षे प्रयत्न करूनही मूल होत नसल्याने हे जोडपे चिंताग्रस्त झाले होते. चाचणीनंतर असे लक्षात आले की, ही महिला पीसीओएससारख्या आजाराने ग्रस्त होती आणि त्यामुळेच नैसर्गिकरीत्या गर्भधारणा होत नसल्याचेही समजले.

# कर्करुग्णांसाठी जीवनसत्त्व 'ड' लाभदायक



कर्करोग झालेल्यांनी किमान तीन वर्षे नियमितपणे जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेतल्यास ते जगण्याचा कालावधी आणखी काही वर्षे वाढू शकतो, असे एका अभ्यासात दिसून आले आहे. याबाबत अमेरिकेतील मिशिगन स्टेट विद्यापीठातील संशोधकांनी अभ्यास केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, जीवनसत्त्व 'ड'मुळे हाडे मजबूत होण्याबरोबरच आणखीही महत्त्वपूर्ण लाभ होतात. मिशिगन स्टेट विद्यापीठाचे तारेक हायकल यांनी सांगितले की, जीवनसत्त्व 'ड'च्या सेवनामुळे कर्करोग झालेल्या व्यक्तींमध्ये मृत्यूची जोखीम कमी झाल्याचा परिणाम चांगल्या प्रकारे दिसून येतो. पण त्याच वेळी या जीवनसत्त्वामुळे कर्करोगाला प्रतिबंध होऊ शकतो, असे दाखवणारा कोणताही पुरावा मिळू शकलेला नाही. या संशोधकांनी कर्करोग प्रतिबंधाचे उपचार झालेल्या ७९ हजारांहून अधिक रुग्णांची माहिती तपासली. ही माहिती विविध अभ्यासात नोंदवण्यात आली होती. या अभ्यासात जीवनसत्त्व 'ड'ची मात्रा घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार घेतलेल्या रुग्णांची तुलना करण्यात आली होती. हा कालावधी किमान तीन वर्षांचा होता. यात कर्करोग झाल्यानंतर मृत्यू झालेल्यांवर लक्ष केंद्रित करण्यात आले. या संशोधनात असे दिसून आले की, जीवनसत्त्व 'ड' घेणारे रुग्ण आणि मानसिक लाभासाठी औषधोपचार केलेले रुग्ण यांच्यातील मृत्यूच्या प्रमाणात मोठा फरक आहे. जीवनसत्त्व 'ड' हे कर्करुग्णांसाठी किती महत्त्वपूर्ण ठरते, हे यातून दिसून आले, असे हायकल म्हणाले. असे असले तरी जीवनसत्त्व 'ड'ची नक्की किती मात्रा घ्यावी आणि त्याची रक्तातील पातळी किती असावी, ही माहिती यात मिळाली नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# व्हॉट्सअॅपवर 'या' नंबरवरून फोन आला तर अजिबात उचलू नका! बँक अकाऊंट होईल रिकामे

**जर तुम्हाला देखील सतत काही ठरावीक आंतरराष्ट्रीय नंबर्सवरून व्हॉट्सअॅपवर कॉल किंवा मेसेज येत असेल तर तुम्हाला सावध होण्याची गरज आहे. कारण हा तुमच्यासोबत स्कॅम असू शकतो.**

व्हॉट्सअॅपचा वापर आपण सर्वच जण मोठ्या प्रमाणात करत असतो. एक इन्स्टंट मेसेजिंग ॲप म्हणून व्हॉट्सअॅप बेस्ट आहे. आपल्या नॉर्मल गप्पाटप्पांपासून ते ऑफिसची महत्त्वाची कामेही आपण या व्हॉट्सअॅपवर करत असतो. पण हे ॲप जेवढं उपयुक्त आहे तेवढंच धोकादायक आहे. आजकाल व्हॉट्सअॅपद्वारे कितीतरी स्कॅम होत असून अनेकजण यात फसले जात आहेत. आता आणखी एक नवीन प्रकरण समोर आले आहे. अनेकांना आंतरराष्ट्रीय नंबरवरून अचानक कॉल येत आहेत. हे कॉल्स इथिओपिया (+251), मलेशिया (+60), इंडोनेशिया (+62), केनिया (+254), व्हिएतनाम (+84) आणि इतर यांसारख्या वेगवेगळ्या देशांचे आहेत. तर व्हॉट्सअॅप कॉल हे इंटरनेटद्वारे केले जातात. काही मीडिया रिपोर्ट्सनुसार, काही स्कॅम एजन्सी कार्यरत आहेत ज्या व्हॉट्सअॅप कॉलसाठी आंतरराष्ट्रीय नंबर विकत आहेत. कोणत्याही आंतरराष्ट्रीय कॉल शुल्काची चिंता न करता या क्रमांकांवरून कॉल करू शकतात. अशाप्रकारच्या कॉल्समुळे तुमचा फोन हॅक होऊ शकतो, तुमचे बँकिंग डिटेल्सही समोरच्यांकडे जाऊ शकतात आणि तुमचं बँक खातं मोकळं होऊ शकतं. ट्विटरवरील अनेक वापरकर्त्यांनी आंतरराष्ट्रीय नंबरवर एकापेक्षा जास्त वेळा कॉल येत असल्याचं सांगितलं आहे. जर तुमच्या बाबतीतही असेच होत असेल आणि तुम्हाला या समस्येपासून मक्ती मिळवायची असेल, तर तुम्हाला या नंबरवरून येणाऱ्या कॉल्सकडे दुर्लक्ष करावे लागेल. जर तुम्हाला अचानक एखाद्या आंतरराष्ट्रीय नंबरवरून कॉल दिसला तर तो ताबडतोब डिस्कनेक्ट करा. हा नंबर देखील ब्लॉक करा. ते तुमची वैयक्तिक माहिती चोरू शकतात आणि तुम्ही तुमचे बँक खाते साफ करू शकतात.



**हा व्हॉट्सअॅप स्कॅमही चर्चेत**
**लोकांना व्हॉट्सअॅप मेसेजद्वारे नोकऱ्या दिल्या जात असल्याचे मेसेज येत आहेत. हे लोक कोणत्या ना कोणत्या कंपनीचे असल्याचा दावा करतात आणि दररोज पैसे पुरवण्याची चर्चा करतात. घरबसल्या आरामात काम करता येतं असं म्हणतात. एकदा वापरकर्त्यांना त्यांचे पैसे मिळाले की ते स्कॅमरवर विश्वास ठेवू लागतात आणि मोठ्या घोटाळ्यात अडकतात. अशा घटना यापूर्वीही समोर आल्या आहेत. अशा प्रकरणांपासून दूर राहण्याचीही गरज आहे.**

# एकतर खात्यावर येतील 4500 रुपये, नाहीतर योजनेतून नाव बाद! 'लाडकी बहिण'साठी 31 मार्च निर्णायक

**या संस्थांचा पुढाकार**
कुलाबा मलजल प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्यावर प्रति किलो लिटर १२ रुपये खर्च येत आहे. त्यानुसार आता महापालिका प्रति किलोलीटर अर्थात एक हजार लिटर पाण्यासाठी १५ रुपये दर आकारण्याचे निश्चित केले आहे. यासाठी कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्रामधून प्रक्रिया केलेले सांडपाण्याच्या खरेदीसाठी एस. आर. एंटरप्राजेस ही संस्था पुढे आली आहे. एस.आर. एंटरप्राइजेस महिला बचत गटाने या केंद्रातून सुमारे ३० लाख लिटर प्रतिदिन इतके प्रक्रिया केलेले पाणी खरेदी करण्याची तयारी दर्शवली आहे.




■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

महाराष्ट्र शासनानं राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना पाठबळ देण्यासाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू केली आणि सत्ताधाऱ्यांना राज्यातील निवडणुकीत यश मिळालं तेसुद्धा याच योजनेमुळं अशा या योजनेअंतर्गत 28 जून 2024 पासून या योजनेला मान्यता मिळाली, ज्यानुसार 21 ते 64 वर्षे या वयोगटातील महिलांच्या खात्यावर दरमहा 1500 रुपये येण्यास सुरुवात झाली. मात्र आता 31 मार्च 2026 पूर्वी काही तरतूदींची पूर्तता न केलेल्या महिलांना या योजनेतून वगळलं जाणार आहे, ज्यामध्ये ई केवायसीचाही समावेश आहे. अर्थात त्यांच्या खात्यांवरल योजनेचे पैसे येणार नसून, त्यांना दिला जाणारा लाभ कायमचा बंद होईल.

**खात्यावर नेमकी किती रक्कम येणार?**

अधिकृत माहितीनुसार एप्रिल महिन्यात योजनेतील लाभार्थी महिलांच्या खात्यावर फेब्रुवारी, मार्च आणि एप्रिल अशा तीन महिन्यांचे एकूण 4500 रुपये इतकी रक्कम येईल. मात्र, ज्या महिलांनी ई केवायसी केली नाही किंवा ई केवायसीमध्ये काही चूक असल्यास ती दुरूस्त न केल्यास त्या महिलांना योजनेचा लाभ इथून पुढं मिळणार नाही.

अद्यापही या योजनेतील मोठ्या संख्येनं महिलांना ई केवायसीतील दुरुस्ती करण्याची संधी असून, बंद झालेले योजनेचे हप्ते परत सुरू करण्याची संधी असून स्थानिक प्रशासन मुंबई आणि अशा इतरही ठिकाणी महिलांना यासाठी मदत करत आहे.

**योजनेतून कोणाची नावं वगळली?**

सरकारी नोकरी, पुरुष लाभार्थी, चारचाकी वाहन असणाऱ्या महिला किंवा अशा कुटुंबातील महिला, कुटुंबाचं उत्पादन अडीच लाखांपेक्षा अधिक असणं, केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर कोणत्या योजनेचा लाभ घेत असणाऱ्या महिला किंवा वयोमर्यादेच्या अटीत न बसणाऱ्या महिलांची नावं या योजनेतून वगळण्याच आली आहेत. शिवाय नव्या माहितीनुसार मृत महिलांची नावंसुद्धा योजनेतून वगळण्यात आली आहेत.

नोव्हेंबर- डिसेंबर महिन्यापासूनच राज्य शासनाकडून ई केवायसीचे आदेश दिले होते मात्र तरीही अनेक महिलांनी ई केवायसी केली नाही. काहींनी ही प्रक्रिया केली असली तरीही त्याच चुका असणाऱ्या लाभार्थी महिलांची संख्याही मोठी असल्यामुळं याच चुकांच्या दुरूस्तीसाठी 31 मार्चपर्यंत त्यासाठी मुदत देण्यात आली आहे. मात्र केवायसी राहिलेल्यांना ही मुदतवाढ नाही.

# मुंबईतील बांधकामे सिल करा

## विकासकांना टाका काळ्या यादीत... मुंबई महापालिकेची भूमिका

■मुंबई। प्रतिनिधी,

मार्च महिना संपत असल्यामुळे महापालिका प्रशासनाच्यावतीने मालमत्ता कराची वसूली जोरात सुरु असून ज्या करदात्यांकडून या कराची भरणा केली जात नाही, त्यांच्याकडून दंड आकारणी आणि प्रसंगी मालमत्तेचा लिलाव केला जात आहे. मात्र, सर्वसामान्य जनतेला हा न्याय लावणाऱ्या प्रशासनाकडून म्हाडा, एमएमआरडीए, बीपीटीकडून अशाप्रकारे वसूल का केली जात नाही. तसेच एसआरए आणि अन्य पुनर्विकास प्रकल्पांमध्ये विकासकांकडून मालमत्ता कराची रक्कम भरत नाही, आणि रहिवाशांवरच याचा भूर्दंड टाकला जातो,अशा विकासकांना काळ्या यादीत टाका किंवा त्यांच्या मालमत्ता सिल करण्यात याव्या अशाप्रकारची मागणीच महापालिका सभागृहात सदस्यांनी केली. त्यामुळे याबाबत योग्य त्या उपाययोजना तथा कार्यवाही करण्याचे निर्देश महापौर रितू तावडे यांनी यावेळी दिले.




मुंबई महापालिका सभागृहात काँग्रेसचे नगरसेवक राजा रहेबर खान यांनी हरकतीच्या मुद्दयाद्वारे मालमत्ता कर वसूलीमध्ये दुजाभाव होत असल्याचे सांगत सर्वसामान्यांनी कर न भरल्यास दोन टक्के दंड आकारला जातो आणि तोही नाही भरला तर मालमत्तांचा लिलाव केला जातो. पण असेच धोरण सरकारी प्राधिकरणांच्या बाबतीत का नाही असा सवाल केला. यावर विधी व महसूल समिती अध्यक्षा दिक्षा कारकर यांनी मालमत्ता कराची वर्षभराचे टार्गेट ७१०० कोटी रुपये एवढे असून मार्च महिन्याच्या शेवटला जेव्हा आपण मुंबईकरांना हा कर भरा म्हणून आवाहन करतो, तेव्हा त्याची भरणा केंद्रही सुरु असायला हव्या, परंतु महापालिकेच्या नागरी भरणा केंद्रात माणसेच नसून काही खिडक्याच बंद असल्याचे दिसून येत आहे. किमान ३१ मार्च पर्यंत तरी पूर्ण क्षमतेने या कराच्या वसूलीसाठी प्रयत्न करता नागरी भरणा केंद्राच्या खिडक्या सुरु राहायला हव्यात,असे सांगत अशाप्रकारे निष्काळजी करणाऱ्यांवर कारवाईची मागणी केली. तर उबाठाचे सचिन पडवळ यांनी उध्दव ठाकरेंमुळे महापालिकेला ऑक्ट्रॉयच्या बदल्यात जीएसटीची रक्कम मिळत असल्याचे सांगितले.

तर यशोधर फणसे यांनी करदात्यांसाठी आम्ही कोणत्याही सुविधा देत नाही, त्यामुळ आमदार आणि खासदार ज्याप्रमाणे खासगी इमारतींमध्ये कामे करतात, तशी कामे नगरसेवक निधीतून केल्यास करदात्यांना काही सुविधा देता येतील असे सांगितले. तर भाजपचे बाळा तावडे यांनी कांदिवलीतील एका एसआरए प्रकल्पातील ३५० भाडेकरुंना सन २०१७ ते २०२२ दरम्यानच्या मालमत्ता कराची थकीत रक्कम भरण्याची सक्ती केली जात असल्याचे सांगितले. जे विकासकाने भरायला हवे, पण विकासाला सक्ती न करता भाडेकरुंवर दबाव आणला जात असल्याचे सांगितले. तर निशा परुळेकर यांनी कांदिवली ठाकूर संकुलातील १८०० कुटुंबांना २०१८ ते २०२२ दरम्यानच्या थकीत मालमत्ता बिलाची रक्कम भरण्याची सक्ती केली जात आहे. महापालिका विकासकाला सोडून सोसायटीवर याचा भुर्दंड टाकत असल्याचे सांगितले. गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये नगरसेवक निधीतून काम करण्याची परवानगी दिली जावी अशी मागणी प्रकाश दरेकर यांनी केली, यावर यामिनी जाधव यांनी जर एखाद्या विकासकाने मालमत्ता कराची रक्कम भरली नाही तर त्यांच्या मालमत्तांचा लिलाव होतो का असा सवाल केला.

माजी सभागृहनेत्या विशाखा राऊत यांनी मुद्रांक शुल्कातील १ टक्का महसूल मिळावा यासाठी प्रयत्न केला जावा अशी सूचना केली. शिवसेनेचे अमेय घोले यांनी जीएसटीबाबत कुठेच मोठा सार्वजनिक करार झाला नसून आतापर्यंत ५० हजार कोटींहून जीएसटीच्या माध्यमातून रक्कम प्राप्त झाल्याचे सांगितले. तसेच शासनाकडे जी थकीत आहे,त्यातील मागील २५ वर्षांतील शिल्लक थकबाकी किती याचाही हिशोब समोर यायला हवा असे सांगत विरोधकांचा समाचार घेतला. स्थायी समिती अध्यक्ष प्रभाकर शिंदे यांनी मालमत्ता कर भरणाऱ्यांना आपण काय सुविधा देतो हा मोठा प्रश्न असून अमेय घोल यांच्या वक्तव्याचे समर्थन केले. तर किशोरी पेडणेकर यांनी राऊत यांची मागणी लावून धरत १ टक्का मुद्रांक शुल्क मिळायला हवी अशी मागणी केली.

# मुंबईत ५४ हजारांहून अधिक क्षयरोगच्या रुग्णांची नोंद

## १ लाखाहून अधिक लोकांची तपासणी... रुग्ण बरे होण्याचा दर ८१ टक्क्यांपर्यंत पोहचला




■मुंबई। प्रतिनिधी,

'क्षयरोगमुक्त मुंबई' यासाठी मुंबई महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. तरीही विविध आरोग्य संस्थांमध्ये वर्ष २०२५ मध्ये मुंबईत एकूण ५४ हजार ३९० क्षयरोग रुग्णांची नोंद झाली असून यापैकी ४८ हजार ८३५ रुग्ण मुंबईचे रहिवासी होते. यापैकी ४० टक्के रुग्ण एक्स्ट्रा पल्मनरी, ६ टक्के बालरुग्ण आणि ८ टक्के औषध प्रतिरोधक क्षयरोग प्रकारातील होते. मंगळवारी जागतिक क्षयरोग दिन असून मुंबई टीबीमुक्त अभियान सुरु करण्यात आले आहे. राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारने २०२५ मध्ये 'क्षयरोगमुक्त भारत अभियान' सुरू केले. या कार्यक्रमांतर्गत १३ लाख ८ हजार २०० संवेदनशील लोकसंख्येची तपासणी करण्यात आली. त्यापैकी १ लाख २४ हजार ७७४ संशयित रुग्णांचे एक्स-रे करण्यात आले. औषध प्रतिरोधक क्षयरोगाचे रुग्ण बरे होण्याचा दर गेल्या ८ वर्षात दुप्पट होऊन ८१ टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. जागतिक क्षयरोग दिन २४ मार्च रोजी असून २०२६ चे घोषवाक्य 'यस, वुई कॅन एन्ड टीबी' 'लेड बाय कंट्रीज, पॉवर्ड बाय पिपल' असे आहे.

**निदान सुविधांचे उन्नतीकरण :** मुंबईतील आरोग्य संस्थांच्या ठिकाणी ४५ सीबीएनएएटी आणि ३४ ट्रूनॅट पोर्टेबल मशीन उपलब्ध आहेत. या संयंत्राद्वारे क्षयरोग व रिफॅम्पिसीन औषध-प्रतिरोधक क्षयरोगाचे मोफत व अचूक निदान केले जाते. तसेच आता केंद्रीय क्षयरोग विभागाकडून ४ पॅथोडिटेक्ट मशीनही उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या संयंत्राद्वारे क्षयरोग तसेच रिफॅम्पिसीन व आयसोनाझेड औषध-प्रतिरोधक क्षयरोगाचे देखील निदान करणे होईल. सध्या २ पॅथोडिटेक्ट संयंत्रे सर जे.जे. रुग्णालय व आयआरएल जीटीबी प्रयोगशाळेत उपलब्ध झाली आहेत. वर्ष २०२५ मध्ये एकूण २ लाख मॉलीक्यूलर चाचण्या करण्यात आल्या.

**पौष्टिक आहार किट :** निक्षय मित्रांच्या माध्यमातून दरमहा टीबी रुग्णांना सहा महिन्यांकरिता पौष्टिक आहार किट देण्यात येते. मागील २ वर्षांत निक्षय पोषण योजनेअंतर्गत एकूण १,४८,८६७ रेशन किट वितरित करण्यात आले.

**क्षयरोग प्रतिबंधक उपक्रम :** सीवाय-टीबी चाचणीद्वारे लक्षणे नसतानाही संसर्ग ओळखता येतो. २०२५ मध्ये १३,३११ उच्च जोखीम व्यक्तींची तपासणी झाली, त्यापैकी ११६१ पॉझिटिव्ह आढळले व १६५५ जणांना प्रतिबंधात्मक उपचार देण्यात आले.

**हँडहेल्ड एक्स-रे मशीन :** २४ मशीनपैकी १९ मशीन १६ उपनगरीय रुग्णालये व जीटीबी रुग्णालयात उपलब्ध आहेत. सीएसआरअंतर्गत विभागस्तरावर आणखी २४ मशीन एक्स-रे तपासणीसाठी वापरात आहेत. याद्वारे आतापर्यंत वर्ष २०२५-२०२६ मधे एकूण ७४३०७ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले आहेत.

**खोकला, ताप, वजन घटणे टीबीची लक्षणे! :** दोन आठवड्यांपेक्षा जास्त खोकला, ताप, वजन घटणे, रात्री घाम येणे, भूक न लागणे, छातीत दुखणे, श्वास घेण्यास त्रास, रक्त किंवा कफ खोकल्यातून येणे, थकवा, मानेला सूज वरीलपैकी कोणतीही लक्षणे आढळल्यास दुर्लक्ष करू नये. नागरिकांनी जवळचा बीएमसी दवाखाना, हेल्थ पोस्ट किंवा ह्यआपला दवाखानाह्न येथे जाऊन मोफत तपासणी व उपचार करून घ्यावे, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

# सांडपाण्यावर प्रक्रिया केलेल्या पाण्याला वाढती मागणी

## कुलाब्यात संस्थांचा पुढाकार... प्रति हजार लिटरसाठी १५ रुपयांचा दर

**या संस्थांचा पुढाकार**
कुलाबा मलजल प्रकल्पातून प्रक्रिया केलेल्या पाण्यावर प्रति किलो लिटर १२ रुपये खर्च येत आहे. त्यानुसार आता महापालिका प्रति किलोलीटर अर्थात एक हजार लिटर पाण्यासाठी १५ रुपये दर आकारण्याचे निश्चित केले आहे. यासाठी कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्रामधून प्रक्रिया केलेले सांडपाण्याच्या खरेदीसाठी एस. आर. एंटरप्राजेस ही संस्था पुढे आली आहे. एस.आर. एंटरप्राइजेस महिला बचत गटाने या केंद्रातून सुमारे ३० लाख लिटर प्रतिदिन इतके प्रक्रिया केलेले पाणी खरेदी करण्याची तयारी दर्शवली आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता, सांडपाण्यावर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पिण्याव्यतिरिक्त कामासाठी उपयोग करणे शक्य आहे. यासाठी कुलाबा येथे सांडपाणी प्रकल्प राबविण्यात आला असून मलजल प्रक्रिया केंद्रातील ३७ दशलक्ष लिटर क्षमतेच्या प्रकल्पातून १० दशलक्ष लिटर प्रक्रिया केलेल्या पाण्याचा पुनर्वापर केला जात आहे. या पाण्याचा पुनर्वापर करण्यासाठी प्रक्रिया केलेल्या पाण्याची विक्री केली जात आहे. हे प्रक्रिया केलेले पाणी प्रति हजार लिटर हे १५ रुपये दराने विकणार आहे. कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्रामधून प्रक्रिया केलेले सांडपाण्याची खरेदी करण्यासाठी कंपन्या पुढे आल्या असून या खासगी, निमशासकीय, शासकीय आस्थापनांना



विक्री करण्याचा दर निश्चित केला आहे. हे पाणी खरेदी करण्यासाठी मागणी वाढू लागली आहे.

मुंबई मलनिःसारण प्रकल्प भाग २ अंतर्गत कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्राचे काम २०२० मध्ये पूर्ण झाले आहे. त्यानंतर या केंद्राची दैनदिन देखभाल करण्यासाठी पुढील १५ वर्षांच्या कालावधीसाठी सुएझ इंडिया प्रा. लि. कंपनीची निवड केली आहे. प्रकल्पाची क्षमता प्रति दिन ३७ दशलक्ष लिटर एवढी आहे. त्यापैकी १० दशलक्ष लिटर सांडपाण्यावर तृतीयक प्रक्रिया केली जाते. यातील सांडपाणी अधिक शुद्ध होऊन त्याचा पुनर्वापर पेयत्तर अर्थात पिण्याव्यतिरिक्त इतर वापरासाठी म्हणजेच बांधकाम, उद्याने, तसेच इतर सफाई कारणासाठी केला जाऊ शकतो.

मुंबई मेरीटाईम बोर्ड यांना समुद्रकिनाऱ्यांची धूप रोखण्यासाठी २०२० मध्ये हाती घेतलेल्या टेट्रापॉड टाकण्याच्या कामांसाठी कुलाबा मलजल प्रक्रिया केंद्रांमधून प्रक्रिया केलेले सांडपाणी त्यांच्या मागणीनुसार रुपये २१ प्रति १००० लिटर दराने पुरविले जाते. दरम्यान, याबाबतचा प्रस्ताव बुधवारी होणाऱ्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुरीसाठी सादर करण्यात आला आहे.

# पुण्यात विजेच्या धक्क्यात विद्यार्थ्याचा मृत्यू

## मेसमधील वॉटर प्युरिफायरमधून शॉक, विद्यार्थ्यांचा संताप



■पुणे। प्रतिनिधी,

कृषी महाविद्यालयातील मेसमधील जलशुद्धीकरण यंत्रातून विजेचा धक्का बसल्याने एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. या घटनेनंतर विद्यार्थ्यांमध्ये संताप व्यक्त होत असून दोषींवर कारवाई व सुरक्षाविषयक लेखापरीक्षण करण्याची मागणी होत आहे.

चैतन्य कुंडलिक चव्हाण (२३) असे मृत विद्याथ्यार्चे नाव आहे. चैतन्य कृषी महाविद्यालयात ॲग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षात शिक्षण घेत होता. तो 'ई-मेस' समितीचा सदस्य होता. १४ मार्च रोजी तो मेसचे कामकाज पाहत असताना जलशुद्धीकरण यंत्र (फिल्टर) व्यवस्थित कार्यरत आहे का, याची पाहणी करत होता. त्यावेळी अचानक यंत्रात वीज प्रवाह उतरल्याने त्याला जोराचा विजेचा धक्का बसला आणि तो बेशुद्ध पडला. मात्र उपचारादरम्यान मंगळवारी त्याचा मृत्यू झाला.

महाविद्यालय परिसरात विद्यार्थ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून जबाबदारांवर कठोर कारवाई करावी तसेच संपूर्ण कॅम्पसमध्ये विद्युत सुरक्षेचे लेखापरीक्षण तातडीने करावे, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे.

# एक फ्लॅट, दोन पुरुष आणि फ्लॅटमध्ये मोलकरणीची रक्ताच्या थारोळ्यातील बॉडी, ठाण्यातील उच्चभ्रू सोसायटीत काय घडलं?

■मुंबई। प्रतिनिधी,

ठाणे जिल्ह्यातील मीरा रोड परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि थरकाप उडवणारी घटना समोर आली आहे. एका उच्चभ्रू हाऊसिंग सोसायटीमधील फ्लॅटमध्ये 40 वर्षीय घरकाम करणाऱ्या महिलेचा रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मृतदेह आढळला आहे. महिलेच्या शरीरावर चाकूने सपासप वार करण्यात आले असून, आरोपीने अत्यंत क्रूरपणे ही हत्या केल्याचे प्राथमिक तपासात समोर येत आहे. बुधवारी (25 मार्च) संध्याकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर



**ज्या फ्लॅटमध्ये काम करायची तिथेच आढळला मृतदेह**
मिळालेल्या माहितीनुसार, मृत महिला ज्या फ्लॅटमध्ये काम करायची, त्याच फ्लॅटमध्ये तिचा मृतदेह संशयास्पद स्थितीत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच स्थानिक पोलिसांनी फ्लॅट सील केला असून फॉरेन्सिक टीमला पाचारण करण्यात आले आहे. प्राथमिक तपासणीतच हा हत्येचा प्रकार असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या हत्येमुळे सोसायटीमधील रहिवाशांमध्ये भीतीचे सावट पसरले असून, सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत तपासचक्र फिरवली आहेत.

**फ्लॅटमध्ये राहतात दोन पुरुष**

या प्रकरणातील सर्वात संशयास्पद बाब म्हणजे, ज्या फ्लॅटमध्ये ही हत्या झाली तिथे दोन पुरुष वास्तव्यास होते. धक्कादायक म्हणजे, मृत महिला आणि त्या फ्लॅटमध्ये राहणारे दोघेही पुरुष, या तिघांकडेही घराच्या चाव्या होत्या. यामुळे बाहेरून कोणी व्यक्ती घरात घुसली की परिचयातीलच कोणाचे हे कृत्य आहे, याबाबत पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठवला असून, अहवालानंतरच मृत्यूची नेमकी वेळ आणि अधिक तपशील समोर येणार आहेत.

**लवकरच आरोपीच्या मुसक्या आवळू**

पोलिस सध्या या प्रकरणाचा तपास लूटमार, जुना वाद किंवा वैयक्तिक वाद अशा सर्व बाजूंनी करत आहेत. परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची कसून तपासणी केली जात असून, घटनेच्या वेळी फ्लॅटमध्ये कोणाची ये-जा होती, याचा शोध घेतला जात आहे. "आम्ही सर्व पुराव्यांची साखळी जोडत असून लवकरच आरोपीच्या मुसक्या आवळू," असा विश्वास तपास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या क्रूर हत्याकांडामागचे नेमके कारण काय होते, हे पाहणे आता महत्त्वाचे ठरणार आहे.

# एकतर्फी प्रेमातून रक्तरंजित राडा, मुंबईत कॉलेज तरुणीवर कोयत्याने हल्ला, मित्राने स्वतःवर झेलला वार

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील मुलुंड परिसरात एक धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. इथं एका कॉलेजच्या विद्यार्थिनीवर जीवघेणा हल्ला झाला आहे. एका तरुणाने एकतर्फी प्रेमातून तिच्यावर हल्ला केला. यावेळी बाजुलाच असलेल्या पीडितेच्या एका मित्राने कोयत्याचा वार स्वतःवर झेलत तरुणीला वाचवलं आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला असून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. कॉलेजच्या आवारातच हा प्रकार घडल्याने खळबळ उडाली आहे.

आशिष गौतम बनसोडे असं अटक केलेल्या २१ वर्षीय आरोपी तरुणाचं नाव आहे. तर पीडित मुलगी १६ वर्षांची आहे. आरोपी आणि पीडित मुलगी एकमेकांच्या ओळखीचे असून दोघंही बदलापूर परिसरात वास्तव्याला आहेत. आरोपीचं पीडितेवर एकतर्फी प्रेम होतं.



यातूनच तरुणाने हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २५ मार्च रोजी पीडित मुलगी ही मुलुंड येथे कॉलेजला आली होती. यावेळी आरोपीने पाठीमागून येऊन पीडित मुलीस पकडलं. तिच्या गळ्यात हात टाकून 'तू माझ्याशी का बोलत नाहीस?' असा जाब विचारला. तिला काही कळायच्या आत आरोपीनं धारदार कोयत्याने तिच्यावर वार केला. मात्र त्याच ठिकाणी असलेला पीडित मुलीचा मित्र मध्ये आला आणि आरोपीचा वार स्वतःच्या अंगावर झेलला. त्याच्या पाठीमागील बाजूस कोयत्याचा वार लागून तो जखमी झाला.

ही घटना घडल्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पळून गेला. काही विद्यार्थ्यांनी तातडीने विद्यार्थ्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल केलं. दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकाराने कॉलेज परिसरात एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर अवघ्या 24 तासाच्या आत पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेला कोयता आरोपीकडून जप्त केला आहे. घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com